रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ११८
www.ramprahar.com

गुरुवार, १४ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आपली लढाई 'महाअडाणी' आघाडीविरोधात-योगी/२
उत्तर भारतीय नागरिकांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश/३
पनवेलच्या बॉक्सर मुली भुसावळमध्ये चमकल्या/८

## अपनी ताकद आजमालो; उपमुख्यमंत्री फडणवीसांचे बंडखोरांना आव्हान



**नवी मुंबई** : राज्यात सुरू असणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नवी मुंबईत भाजपमध्ये बंडखोरी झाली. या बंडखोरांचा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अपनी ताकद आजमालो, अपनी हैसियत क्या है, आपकोभी समझ आ जायेगा', अशा शब्दांत समाचार घेत निवडणुकीच्या रिंगणात खुले आव्हान दिले. येत्या २३ तारखेला मत मोजणीनंतर बंडखोरांचे तोंड बारीक होईल, त्यांना त्यांची जागा दिसेल, असा टोलाही त्यांनी लगावला. कोपरखैरणे येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या वेळी गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे, जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी खासदार संजीव नाईक आणि ऐरोलीचे उमेदवार गणेश नाईक उपस्थित होते.

# आज खारघरमध्ये गरजणार पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आवाज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड, ठाणे शहर, नवी मुंबईतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि.१४) दुपारी २ वा. खारघर येथे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य जाहीर सभा होणार आहे.

सेक्टर २९मधीलमधील सेंट्रल पार्कजवळील मैदानात ही सभा होणार आहे. या सभेसाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते, नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता असल्यामुळे भव्य व्यासपीठ उभारले आहे.



त्याचबरोबर सभेच्या तयारीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून आढावा घेतला आहे.

खारघर येथील पेठपाडा मेट्रो रेल्वे स्थानकाच्या बाजूला असलेल्या मैदानात हेलिपॅड उभारण्यात आला आहे, तसेच या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. श्वानपथकाद्वारे या जागेची तपासणी करण्यात येत आहे.

# कलम ३७० पुन्हा लागू होणार नाही

## ■ गृहमंत्री अमित शाह यांची धुळ्यातील सभेत ग्वाही



**धुळे : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर कलम ३७० पुन्हा लागू करण्यावरून वाद सुरू झाला आहे. ओमर अब्दुल्ला सरकार जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० परत आणणार असल्याचे सातत्याने सांगत आहेत, मात्र कोणत्याही परिस्थितीत जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० परत येणार नाही. राहुल गांधी जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० परत करण्याची भाषा करतात, पण इंदिरा गांधीदेखील स्वर्गातून खाली उतरल्या, तरी जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० परत येणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी दिली.

धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा मतदारसंघात दोंडाईचा येथे बुधवारी (दि.१३) भाजप महायुतीचे उमेदवार जयकुमार रावल, शिरपूरचे काशीराम पावरा, धुळे शहरचे अनुप अग्रवाल, धुळे ग्रामिणचे राम भदाणे तसेच साक्रीच्या मंजुळा गावीत यांच्या प्रचारासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला आमदार अमरीश पटेल, भाजप ओबीसी आघाडीचे विजय चौधरी, माजी खासदार सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष धरती देवरे, भाजप जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष देवरे यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी गृहमंत्री अमित शाह पुढे म्हणाले की, काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी हे अनुसूचित जाती व जमाती तसेच मागासवर्गीय प्रवर्गाच्या विरोधात आहेत. मोदी सरकारने प्रथमच आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवले. मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात २७ टक्के मंत्री ओबीसी आणि मागासवर्गीय आहेत, तर अनुसूचित जाती प्रवर्गाचे सर्वात जास्त खासदार भाजपचे आहेत. काँग्रेसने नेहमी तुष्टीकरणाचे राजकारण करण्याचे काम केले. काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे आम्ही ३७० कलम हटवले. **(पान २ वर..)**

# विकासासाठी महायुतीला ताकद द्या

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे कळंबोलीत आवाहन





**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसराचा आणखी विकास, तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आशा पूर्ण करण्यासाठी आणि लाडक्या बहिणींना ताकद देण्यासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकारच सत्तेत यायला पाहिजे. त्यामुळे पनवेलकरांच्या अपेक्षेप्रमाणे विकास करण्यासाठी तुमच्या सगळ्यांची ताकद आणि तुमचे पाठबळ मला आणि पर्यायाने महायुतीला द्या, असे आवाहन पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोलीमध्ये झालेल्या भव्य प्रचार रॅलीवेळी केले.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे पनवेल मतदारसंघाचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रचार जोरदार पद्धतीने संपूर्ण मतदारसंघात सुरू आहे. महायुतीचा प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्ता हा आपणच उमेदवार समजून आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. त्या अंतर्गत प्रभाग क्रमांक ८, ९ आणि १०मध्ये भव्य प्रचार रॅलीचे आयोजन महायुतीच्या वतीने करण्यात आले होते. या रॅलीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांना मतदारांनी विजयी आशीर्वाद दिला. या रॅलीतसुद्धा तरुण वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचा जयघोष केला. या रॅलीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, **(पान २ वर..)**

## शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्याविरूद्ध गुन्हा

**अलिबाग** : अलिबाग-मुरूड विधानसभा मतदरसंघाच्या शेकापच्या उमेदवार



चित्रलेखा पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागात जाऊन प्रचार केला. त्यामुळे त्यांच्याविरोधात आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

चित्रलेखा पाटील यांनी मंगळवारी (दि.१२) दुपारी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागात जाऊन कर्मचाऱ्यांची भेट घेऊन आपणास मतदान करण्याचे आवाहन केले. याप्रकरणी कुळवहिवाट शाखेतील नायब तहसीलदार मनोज गोतारणे यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्याची दखल घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विविध समाजबांधवांचा आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकीची अतूट नाळ जुळलेले महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना विविध संघटना, संस्थांचा वाढते समर्थन मिळत आहे. यामध्ये आता बृहन महाराष्ट्र तेली समाज व सर्व बंजारा समाजानेही आपला पाठिंबा लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन जाहीर केला.

या संदर्भातील पाठिंबा पत्र बुधवारी (दि.१३) महाराष्ट्र तेली समाजाच्या वतीने प्रदेश सचिव दिलीप खोंड, सामाजिक कार्यकर्ता अजित पवार, सदस्य क्षीरसागर यांनी व सर्व बंजारा समाजातर्फे देण्यात आले. या वेळी तेली समाजातील मतदारांनी पनवेल मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना जास्तीत जास्त मतदान करून विजयी करावे, असे आवाहन प्रदेश सचिव दिलीप खोंड यांनी केले.

या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, बंजारा समाजाचे खारघर नायक प्रकाश वडते, पनवेल नायक रुपेश चव्हाण, वसंतराव नाईक, दिनकर राठोड, छगन राठोड, भगवान पवार, गणपत राठोड, रमेश राठोड, प्रकाश राठोड, रवी पांडू राठोड, संतोष राठोड, रोहित राठोड, सुनील जाधव, किरण जाधव, सुभाष राठोड, राजू जाधव, किशोर राठोड, विशाल राठोड, संजय राठोड, करण आडे, प्रकाश राठोड, प्रेम चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आपले मनोगत व्यक्त करताना प्रकाश वडते यांनी, पनवेलला विकासाची खरी ओळख करून देणारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व समाजाचा कायम चांगला विचार केला आहे. भविष्यातही त्यांच्याकडून विकासाचा ओघ कायम राहणार आहे, त्यामुळे पुन्हा ते प्रचंड मतांनी विजयी होणे हे सर्व समाजाच्या दृष्टिकोनातून गरजेचे आहे. त्यांचे समाजावर असलेले प्रेम आम्ही पाहिले आहे, त्यामुळे संत सेवालाल महाराजांचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहे, असे नमूद केले.



# आपली लढाई महाविकास नव्हे तर ‘महाअडाणी’ आघाडीविरोधात -सीएम योगी

**भाईंदर : प्रतिनिधी**

जातीच्या नावावर वाटण्या करणाऱ्या काँग्रेसने १९४७ पासून देशासोबत विश्वासघात केला. काँग्रेसचे अस्तित्व आता संपवण्याची वेळ आली आहे, असा हल्लाबोल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व भाजप नेते योगी आदित्यनाथ यांनी बुधवार(दि.१३)च्या सभेत केला. मीरा भाईंदर येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी सायंकाळी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.



व्यासपीठावर मीरा भाईंदर मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता आणि ओवळा माजीवडा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रताप सरनाईक तसेच घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

‘बटेंगे तो कटेंगे’ असा नारा देत योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांचा समाचार घेतला. योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, महाराष्ट्र ही संत, महापुरुषांची पुण्यभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांना एकत्रित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. भारतासाठी ते सदैव प्रेरणादायी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळगंगाधर टिळक, बाजीराव पेशवे यांनी आदर्श घडवला. त्यांच्या प्रेरणेतून देश व समाजासाठी कार्य केले जात आहे.

ते पुढे म्हणाले की, १९४७ पासून निरंतर सत्ता चालवण्याची संधी काँग्रेसला मिळाली होती. मात्र, काँग्रेसने देशासोबत धोका केला. अखंड भारताचे तुकडे केले. आता काँग्रेस अध्यक्ष खरगे माझ्यावर राग व्यक्त करीत आहेत. माझ्यापेक्षा हैदराबादच्या निजामावर त्यांनी राग काढावा. माझ्यासाठी देश व सनातन धर्माशिवाय दुसरे काही नाही.निजामाच्या अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम काँग्रेस करीत आहे, असा आरोप योगी आदित्यनाथ यांनी केला. जिथे विभागणी होते, त्याच ठिकाणी हिंदू उत्सवादरम्यान दगडफेक होते. त्यामुळे मतांचे विभाजन होऊ देऊ नका.

आपली लढाई महाविकास नव्हे तर महाअडाणी आघाडी विरोधात आहे. ते लव जिहाद, लँड जिहाद सारख्या प्रकाराला प्रोत्साहन देतात. त्यामुळे चुकूनही त्यांचा विचार करू नका. अन्यथा आपले सण गणेशोत्सव, रामनवमीच्या मिरवणुकीवर दगडफेक होईल. निवडणुकीत कुठल्याही परिस्थितीत विभागले जाऊ नका, असे आवाहन योगी आदित्यनाथ यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आता नवीन भारताच्या सीमा सुरक्षित आहे. ५०० वर्षांत जे कार्य झाले नाही, ते नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात अयोध्यामध्ये भव्य राम मंदिर उभारून झाले. हा डबल इंजिन सरकारचा लाभ आहे. सर्व समस्यांचे समाधान केवळ डबल इंजिन सरकार असू शकते, असेदेखील ते म्हणाले.

# यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्थेबाबत आदेश

## सर्व मनोरंजनाचे खेळ, दुकाने राहतील बंद

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४च्या अनुषंगाने सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून कर्जत मतदार संघातील ताकई (खालापूर) येथील १५ दिवस चालणारी सार्वजनिक यात्रा ही पोलीस मनुष्यबळाच्या व्यस्त दिनक्रमामुळे १९ व २० नोव्हेंबर २०२४ या दोन दिवसांकरिता यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरू ठेवून, अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ व दुकाने बंद करून यात्रा भरविण्यास जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) मधील तरतुदीन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

१२ नोव्हेंबर २०२४ ते २६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मौजे ताकई, ता.खालापूर येथे धाकटी पंढरी विठ्ठल मंदीर ट्रस्ट, खोपोली नगरपरिषद व ग्रामस्थ मंडळ ताकई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यात्रेमध्ये होणारी सर्वात जास्त गर्दी ही मनोरंजनाच्या खेळांच्या ठिकाणी होत असते. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान गर्दीचे नियोजन आणि सार्वजनिक वाहतूकीची योग्य व्यवस्था राखण्याकरीता पोलीस मनुष्यबळाच्या अतिशय व्यस्त दिनक्रमामुळे १९ ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मनोरंजनाच्या खेळावर आवश्यक ते प्रतिबंध ठेवणे आवश्यक असून, या यात्रेच्या कालावधीत १९ ते २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सार्वजनिक यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरू ठेवून मनोरंजनाचे सर्व खेळ व दुकाने बंद करण्यात यावीत.

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघामध्ये बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या विधानसभा मतदार संघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता मतदान सुरळीतपणे पार पडणे आवश्यक आहे.

# महाड राव मराठा समाजाचा आमदार भरत गोगावले यांना जाहीर पाठिंबा

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील समस्त राव मराठा समाजाने मराठा आरक्षण, समाजाचा व तालुक्याचा विकास या मुद्द्यावर महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार आमदार भरत गोगावले यांना एकमुखी जाहीर पाठिंबा दिला. आज आमशेत येथील समाज मेळाव्या दरम्यान राव मराठा समाज्या प्रत्येक गावातील प्रतिष्ठित नागरिक व प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत व साक्षिने समाजसेवक लक्ष्मण महामुणकर यांना हा पाठिंबा जाहीर केला.

महाड तालुक्यातील सुसंस्कृत व सुशिक्षित समजला जाणारा राव मराठा हा समाज कधीच कोणा एका राजकीय नेत्या पाठिमागे नव्हता, मात्र महायुतीचा काळात मराठा समाजाला मिळालेले दहा टक्के आरक्षण व सवलती तसेच भविष्यात समाजाचा व तालुक्याचा विकास साधण्यासाठी शिवसेनेचे उमेदवार आमदार गोगावले यांना पुन्हा निवडून देण्याच्या उद्देशाने आज आमशेत या ठिकाणी समाज मेळाव्या दरम्यान जाहीर पाठिंबा देण्यात आला.

या वेळी आमदार गोगावले, प्रमोद घोसाळकर, जितेंद्र सावंत, लक्ष्मण महामुणकर, विजय सावंत, प्रभाकर मोरे, महेश शिंदे, समीर महामुणकर, आत्माराम पालांडे, सुभाष महामुणकर, अशोक सावंत, भरत महामुणकर, संजय कदम, सुगंध महामुणकर, चंद्रकांत मोरे, राजेंद्र कळमकर,शरद मोरे, दिलीप मोरे, समीर महामुणकर आदी उपस्थित होते.



या वेळी राव मराठा समाजाचे धन्यवाद व्यक्त करताना आ भरतशेठ गोगावले यांनी मला आज राव साजाने जो आशिर्वाद दिला आहे त्याबद्दल मी धन्यवाद व्यक्त करतो. माझ्या घरी कोणताच दुजा भाव नसतो. सुखात सगळे असतात मात्र प्रसंगात जो उभा राहतो तो खरा साथिदार त्यामुळे आज राव मराठा समाजा बरोबर बेलदार समाजाने व वडार समाजनेदेखील पाठिंबा दिला आहे. मी काम करताना कोणत्या समाजाची संख्या किती आहे हे कधीच बघितले नाही. लोकांमध्ये जाऊन त्यांची सुख दुःख जाणुन घेऊन काम करीत राहण हेच माज व्रत आहे, असे गोगावले या वेळी म्हणाले.

समाजसेवक लक्ष्मण महामुणकर यांनी आपण अनेक निवडणूका पाहील्या पण प्रथमच आ गोगावले चौकार मारणार आहेत. आपल्याला त्यांचा सामना सोपा करुन द्यायचा आहे. आज प्रथमच राव मराठा समाज आमदार गोगावले यांना जाहीर पाठिंबा देत आहे. त्यांना राव समाजाचे निर्णायक मतदान द्यायच आहे. मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिल ते टिकवण्यासाठी पुन्हा एकदा युतीच सरकार येण गरजेच आहे व त्यासाठी आ गोगावलेंना निवडणून द्यायच आहे. तालुक्याचा खर्याअर्थाने विकास भरतशेठ यांनी केला असल्याचे ते यावेळी म्हणाले.

माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र सावंत यांनी आम्ही दोन टक्के असतानाही आमदारांनी मला जिल्हा परिषद सदस्य केल हे त्यांच प्रेम आहे. तर जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी काम करणार्या माणसाला पाठिंबा दिलाच पाहिजे असे म्हणत रावसमाजाने सातत्याने समाजाच नेतृत्व केल आहे. आज आपल्याला याच भावनेने आ गोगावले यांच्या मागे ठाम उभे राहिले पाहिजे. पुर्वी आपण खोत होत पण आता ते दिवस राहिले नाहीत. समाजात मागासले पण वाढल आहे. आम्हाला शिक्षण आणि नोकरीत आरक्षण हव होत ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला दिल. म्हणून युतीच सरकार व आमदार निवडून आणण्याची जबाबदारी आपली सगळ्यांची आहे.

महेश शिंदे यांनी आमदार प्रवीण दरेकर यांनी, महायुती सरकारच्या काळात मराठांचे आरक्षण, शैक्षणिक सवलती, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास मंडळाचे तरुन रोजारांसाठीचे कार्य, सारथी संस्थेचे काम याचा अहवाल प्रसिद्ध केला होता या बाबत समाजाला माहिती दिली व या सवलती व आरक्ष टिकवण्यासाठी महायुती सरकारला पर्यायाने आमदार भरत गोगावलेंना निवडून आणण्याची जबाबदारी आपली असल्याचे सांगितले. आयोजक समीर महामुणकर यांनी राजकीय व सामाजिक जोड असावी म्हणून आज ही पाठिंब्याची सभा घेण्यात आली. तिन दिवसांत समाज एकत्र आल्या बद्दल व पाठिंबा दिल्या बद्दल त्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे युवा महोत्सव

**रायगड : रामप्रहर वृत्त**

युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन शासनाच्या वतीने करण्यात येते. राज्यात वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य नेहरू युवा केंद्र व विविध प्रशिक्षण संस्थांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहे.

प्रत्येक स्तरावर विजयी होणारे युवक युवतींना राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी रायगड जिल्ह्यातील युवक युवतींना जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे माध्यमातून प्राप्त होणार आहे. संकल्पना आधारीत बाबींमध्ये



विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना INNOVATION IN SCIENCE AND TECHNOLOGY या वर्षासाठी निश्चित केले आहे. या संकल्पनेवर आधारीत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवात विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच प्रावीण्य प्राप्त करणाऱ्या संघ / स्पर्धकांना प्रमाणपत्र व चषक देण्यात येतील.

**वयोगट व सहभागाची पात्रता**

या स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी १५ से २९ वर्षे वयोगट राहील. (दि. १२ जानेवारी २०२५ रोजी परिगणना करण्यात येईल) जिल्ह्यातील इंजिनिअरींग कॉलेज, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वैद्यकिय महाविदयालय, कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ, युवा मंडळ तसेच १५ ते २९ वर्ष वयोगटातील युवांना सदर युवा महोत्सवामध्ये सहभागासाठी पात्रता राहील. प्रथम नोदणी करणे आवश्यक राहील. नोंदणीचा अंतिम दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ राहील. युवा महोत्सवाचे आयोजन २७ व २९ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येईल. नोदणी करण्यासाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज संपूर्ण माहिती भरुन फोटोसह स्कॅन करावे, स्कॅन PDF मध्ये करावे व dsoraigad.2009rediffmail.com या ईमेल वर दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी पर्यंत सादर करावे.

सोबत स्पर्धेची माहिती नियमावली व नोंदणीसाठी अर्जाचा विहीत नमुना देण्यात येत आहे. अ.क्र.१.बाबनिहाय सहभागी संख्या– बाब–सहभाग संख्या– पुढीलप्रमाणे – संकल्पना आधारीत स्पर्धा–विज्ञान व तंत्रज्ञान यामधिल नवसंकल्पना INNOVATION IN SCIENCE AND TECHNOLOGY ४०, २.) सांस्कृतिक– समुह लोकनृत्य– १०,लोकगीत–१०,वैयक्तीक सोलो लोकनृत्य–०५,वैयक्तीक सोलो लोकगीत–०५ ३). कौशल्य विकास– कथा लेखन–०३,चित्रकला–०२, वक्तृत्व–०२,कविता–०२. अधिक माहितीसाठी ९५११७०७१०३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग यांनी कळविले आहे.

# अभिनयाचे विनामुल्य ‘मास्टर क्लासेस’ उद्यापासून सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**






रंगपीठ थिएटर, मुंबई आणि श्री. छत्रपती शिवाजी स्मारक ट्रस्ट, मुंबई या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ‘मास्टर क्लासेस सिरीज’चा शुभारंभ शुक्रवारी (दि.१५) सायंकाळी ६.३० वाजता दादर पश्चिम येथील श्री. शिवाजी नाट्य मंदिरातील राजर्षि शाहु सभागृहात होणार आहे.

नाटक, सिनेमा, साहित्य आदी माध्यमातील दिग्गज तज्ज्ञ कलावंतांचे, नवोदित कलावंत, कला प्रांतातले विद्यार्थी, धडपडणारे कलावंत, कला आभ्यासक तसेच रसिक प्रेक्षकांसाठी ही मास्टर क्लासेस सिरीज आयोजित करण्यात येत आहे.

पहिल्या दिवशी शुक्रवारी उद्घाटन सत्रात प्रसिद्ध नाटककार, चित्रपट लेखक व नाट्यप्रशिक्षक प्रा. शफाअत खान यांचा ‘नाटक व सिनेमा व्यक्तिरेखा लेखनाची गुपीतं’ या विषयावर संध्याकाळी ६.३० वाजता तर सुप्रसिद्ध हिंदी सिने–नाट्य अभिनेत्री हिमाणी शिवपुरी यांचा ‘रंगमंच व चित्रपट अभिनय : सृजन प्रक्रिया’ या विषयावर रात्री ८ वाजता मास्टर क्लासेस आयोजित करण्यात आले आहेत.

दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.१६) आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त सुप्रसिद्ध मराठी, हिंदी सिने–नाट्य अभिनेत्री श्रीमती छाया कदम यांचे ‘नाटक–सिनेमातील मी व माझ्या व्यक्तिरेखा’ या विषयावर सायंकाळी ६.३० वाजता तर आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त नाट्य दिग्दर्शक व नाट्य प्रशिक्षक, एन.एस.डी.चे माजी संचालक प्रा. वामन केंद्रे यांचे ‘प्रभावी अभिनय : आतली गोष्ट’ या विषयावर रात्री ८ वाजता मास्टर क्लासेस आयोजित करण्यात आले आहेत.

हा उपक्रम निःशुल्क असुन सर्वांसाठी खुला आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी ७०३९४७५५३७ अथवा ९८२०८६८६२८ या नंबरवर आपले नाव नोंदणी करावी, असे श्री. छत्रपती शिवाजी स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर सावंत व मुंबई रंगपीठ थिएटरच्या अध्यक्षा गौरी केंद्रे यांनी सांगितले.

पान १ वरुन

## कलम ३७० पुन्हा लागू होणार नाही

आता काश्मीरच्या विधानसभेने ३७० कलम परत आणण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, पण इंदिरा गांधी या स्वर्गातून आल्या तरीही ३७० कलम पुन्हा येणार नाही व काश्मीर हे भारताचे अंग कोणीही हिसकावून घेणार नाही, असा इशारादेखील त्यांनी या वेळी दिला.

पंतप्रधान मोदी यांनी देशाला सुरक्षित करण्याचे काम केले. दहा वर्षांत भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नंबरवर आणली. २०२७मध्ये ही अर्थव्यवस्था तीन नंबरवर येईल, असा दावादेखील त्यांनी केला. महाविकास आघाडी सरकारचे नेते खोटे आश्वासन देतात, मात्र मोदी सरकारने दिलेली सर्व आश्वासने म्हणजे काळ्या दगडावरची रेघ असते. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेसाठी दर महिन्याला २१०० रुपये देणार, शेतकरी कर्जमाफी करणार तसेच किसान सन्मान निधी अंतर्गत प्रत्येकाला १५००० रुपये देणार, वृद्ध, विधवा, दिव्यांग पेन्शन २१००पर्यंत करू, तसेच दहा लाख युवांना प्रत्येकी १० हजार ट्युशन फी दिली जाईल. राज्यात २५ लाख रोजगार उत्पन्न केले जातील. २५००० गावांमध्ये रस्ते केले जातील, तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मासिक १५००० मानधन मिळेल व पाच लाखांचा विमा त्यांचा घेतला जाईल, असे आश्वासनदेखील या वेळी शाह यांनी दिले.

## तुम्हाला अपेक्षित विकासासाठी महायुतीला ताकद द्या

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे शहराध्यक्ष मोहन बलखंडे, शिवसेनेचे शहराध्यक्ष तुकाराम सरक, भाजपचे शहराध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानवर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रिया मुकादम, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे, सितेंद्र शर्मा, मंडळ सरचिटणीस दिलीप बिस्ट, आबा घुटुकडे, संदीप म्हात्रे, रामा महानवर, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष गौरव नाईक, यांच्यासह सेक्टरप्रमुख, बिल्डिंगप्रमुख, युवा मोर्चाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी लोकप्रतिनिधी म्हणून केलेली कामे आदर्शवत ठरली आहेत. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांच्याकडून विधायक कार्य होतात. त्याचबरोबर सर्व घटकातील व्यक्तींचा आणि त्यांचा ऋणानुबंध असल्याने प्रचारादरम्यान महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचे जोरदार स्वागत होऊन भरभरून आशीर्वाद मिळत आहे. त्याच अनुषंगाने पनवेल विधासभा क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयाचा जयघोष ऐकायला मिळत आहे.

# कोकणात तुळशी विवाहाची धामधूम सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकणात तुळशीच्या लग्नाची आणि पावसाने ओढ दिल्याने भात कापणीची त्यातच विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्याने, डोअर टू डोअर स्थानिक कार्यकर्त्यांसह सर्व उमेदवारांच्या प्रचाराची धामधूम मोठ्या उत्साहात सुरू आहे. तर एकीकडे तुळशीच्या लग्नाची धामधूम सुरू झाली आहे.

कार्तिकी एकादशीनंतर दुसऱ्या दिवसापासून त्रिपुरी पौर्णिमे पर्यंत होई पर्यंत शहरातील आळी आळीतुन तर गावा गावात विवाहाचा उत्साह शिगेला पोहचला आहे. या करिता काही ठिकाणी पारंपरिक वृंदावन मातीने तयार करून तर नव्या युगातील सिमेंटच्या तुळसी वृंदावनाला रंगरंगोटी करण्याची लगबग पहावयास मिळते बाजारपेठे मध्ये झेंडुची फुले, आवळे, चिंचा, खडके, ऊस, विवाहसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंचे स्टॉल जागोजागी थाटले असुन त्याला खरेदीसाठी ग्राहकांचा मोठा प्रतिसाद पाहावयास मिळत आहे.






**पनवेल : शिवसेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा धर्मवीर वाहतूक सेनेचे रामदास शेवाळे यांच्या हस्ते साप्ताहिक रायगड दर्पणच्या कार्यालयात दिपावली विशेषांकाचे प्रकाशन झाले. या वेळी दैनिक वादळवाराचे संपादक ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक, रायगड दर्पणचे संपादक संदीप मुळीक, प्रकाशक डॉन एन. के. के., शिवसेना शहर संघटक आनंदा माने, ट्रान्सपोर्टर राहुल धुमाळ, पत्रकार विशाल सावंत, अनिल वाघमारे, अनुराग वाघचौरे आदी उपस्थित होते.**

## दुखवटा

### उज्ज्वला जोशी



**उरण :** भाजप कार्यकर्ते व श्री गणेशोत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक, उरणचे सदस्य आशिष जोशी यांच्या मातोश्री उज्ज्वला दत्तात्रेय जोशी (वय ८१) यांचे रविवारी (दि. १०) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुना, मुलगी, जावई व नात असा परिवार आहे. कै. उज्ज्वला जोशी उरण ब्राम्हण सभा, महिला मंडळाच्या सदस्या होत्या. त्यांच्या अंतयात्रेस आमदार महेश बालदी, भाजप कार्यकर्ते, ब्राम्हण समाज, पत्रकार, मित्र व व्यापारी वर्ग उपस्थित होता.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळेच नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका





> पोदीवरील भुयारी मार्ग सुरू झाल्याने आमच्या भागातील शाळेत जाणाऱ्या मुलांना धोकादायक रेल्वे मार्ग ओलांडून जावे लागत नाही. त्यामुळे अपघातचा धोका टळला. त्याबद्दल अनेक पालकांनी माझ्याजवळ येऊन आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले.
> –तेजस कांडपिळे, माजी नगरसेवक

> नवीन पनवेल सेक्टर १५,१६ आणि विचुंबे मधून पनवेल मध्ये जातांना वाहतूक कोंडीमुळे खूप वेळ लागतो. या भुयारी मार्गामुळे वेळ आणि बहुमूल्य इंधनाची बचत होणार आहे. नगरसेवक मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे आणि रेल्वे मंत्र्यांकडे त्याचा पाठपुरावा करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे आमचा वेळ आणि पैसा वाचणार आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद. –वैशाली पाटील, विचुंबे

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका झाल्याने व भविष्यातील नैना प्रोजेक्टमुळे येथील वस्ती बऱ्याच प्रमाणात वाढत आहे. दिवसेंदिवस वाहतुकीची समस्या जटिल होत आहे. राष्ट्रीय महामार्गावरून पुणे व कोकणात नवीन पनवेल, विचुंबे व उसर्ली या भागातून जाणाऱ्यांना पोदीवरील भुयारी मार्ग आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष दिल्यामुळेच पूर्ण झाला. त्यामुळे येथील नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका झाल्याने अनेक नागरिकांनी त्यांना धन्यवाद दिले.

नवीन पनवेलमधील सेक्टर १५, १५ए, पोदी न.१ व विचुंबे या भागातून गोवा आणि पुणे कडे जाणाऱ्या वाहनांना राष्ट्रीय महामार्गावर जाण्यासाठी पोदीजवळील रेल्वे गेट ओलांडून किवा एचडीएफसी सर्कलच्या पूलावरून जावे लागते. या पुलावर वाहतुकीची कोंडी होत असते. कारण माथेरान रस्त्याकडून व डी मार्ट भागातून येणारी वाहतूक ही या पूलावरूनच होत असते. या भागाचा विकास झपाट्याने झाल्याने मोठे प्रकल्प उभे राहिले. वस्ती वाढल्याने वाहतूक वाढली त्याचा परिणाम रोज वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे पोदी जवळ असलेल्या रेल्वे गेटचा वापर नागरिक व विद्यार्थी धोकादायक पद्धतीने करीत होते. त्यामुळे या भागात भुयारी मार्गाची मागणी करण्यात आली होती.

या भुयारी मार्गासाठी १० कोट्यवधीपेक्षा जास्त खर्चाला मंजूरी मिळाली होती. हे काम डिसेंबर २०१७ पासून बंद पडले होते. याबाबत नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ आणि तेजस कांडपिळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना माहिती दिली असता आमदारांनी काम सुरू करण्यासाठी रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन काम पूर्ण करण्याची मागणी केली. आधुनिक पध्दतीने रेल्वे मार्गावर कोणताही ब्लॉक न घेता बांधलेल्या भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाल्याने २४ सप्टेंबर २०२० मध्ये हा मार्ग सुरू करण्यात आला.

# स्वीप कार्यक्रमांतर्गत कामोठे येथे बाईक रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघामध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी बुधवारी (दि.१३) महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार महापालिकेच्या प्रभाग समिती कामोठे येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बाईक रॅली काढण्यात आली. या वेळी अधिक्षक सदाशिव कवठे, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बाईक रॅलीमध्ये १०० हून अधिक या रॅलीत सहभाग घेतला. या वेळी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात आली.

कामोठ्यामधील मनमोहन स्वीटपासून या बाईक रॅलीची सुरूवात झाली. पुढे ऐश्वर्या हॉटेल, कामोठे पोलीस ठाणे, मेन रोडवरून पुन्हा मनमोहन स्वीटला रॅलीचा शेवट झाला. या बाईक रॅली अंतर्गत विविध घोषणा देत बॅनर्सच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. याबरोबरच मतदान जनजागृती कार्यक्रम अंतर्गत डेएनयुएलएम विभाग मार्फत तळोजा मजकूर येथे १२ नोव्हेंबरला बचत गटातील महिलांकरिता बैठक घेण्यात आली.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची सार्वत्रिक निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी १८८ पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. महापालिकेतर्फे स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रभात फेरी, बाईक रॅली, फ्लॅश मॉब, वासुदेव, मास्कॉट्स, सेल्फी पॉइंटस, आईसी व्हॅन, ट्रायसायकलच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. बचत गटाच्या महिलांची बैठक, रॅली, आशा सेविकांच्या माध्यमातून मतदान कमी असणाऱ्या भागात पत्रकाचे वाटप करण्यात येत आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांची रॅली, संकल्प पत्राचे वाटप करण्यात येत आहे.



## निवडक

### कारच्या धडकेत एक जण जखमी

**पनवेल :** भरधाव वेगाने आलेल्या सॅन्ट्रो कारने दुचाकीला धडक दिल्याने ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक जखमी झाले आणि या अपघातात त्यांचा मोबाईल गहाळ झाला. याप्रकरणी कारचालकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चंद्रकांत शिंदे हे कळंबोली येथे राहत असून ते शिल्पा मेडिकलमध्ये गेले होते. औषध घेऊन परत येत असताना सेक्टर एक, कळंबोली येथून भरधाव वेगाने आलेल्या कारने ॲक्टिवाला धडक दिली. यात शिंदे खाली पडले व त्यांच्या उजव्या पायाला दुखापत झाली. त्यानंतर संट्रो कार धडक देऊन भरधाव वेगाने निघून गेली. या अपघातात त्यांचा मोबाईलदेखील गहाळ झाला.

### सोन्याच्या दागिन्यांचा अपहार

**पनवेल :** शहरातील एका सोन्याच्या दुकानात काम करणाऱ्या महिला कामगाराने सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याची घटना घडली आहे. वामन हरी पेठे ज्वेलर्स या दुकानात काम करणाऱ्या एका महिला कामगाराने जवळपास सहा लाख ४२ हजार २१५ रुपये किंमतीच्या दागिन्यांचा अपहार केला व त्याबदल्यात बनावट दागिने बनवून ते ठेवले. याबाबतची माहिती दुकानातील संबंधित अधिकाऱ्यांना मिळताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली. त्यानुसार संबंधित महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** तक्का पनवेल परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ८ नोव्हेंबर रोजी १६ वर्षीय मुलगी ही घरामधून कामाला जाते असे सांगून गेली आणि ती कामावरून परत आली नाही. तिला फोन केला असता फोन स्विच ऑफ आला. तिचा पनवेल परिसरात शोध घेतला, मात्र ती सापडून न आल्याने अज्ञात व्यक्तीने तिचा अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# कामोठ्यातील उत्तर भारतीय नागरिकांचा भाजपमध्ये प्रवेश

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री व राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची नुकतीच कामोठे येथे जाहीर सभा झाली. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत कामोठ्यातील उत्तर भारतीय नागरिकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

यामध्ये भंडारी यादव, विनय दुबे, संजय सिंह, नरेंद्र दुबे, प्रीयांसू पाठक, निरज तिवारी, कौशल तिवारी, शालिनी सिंग या सर्वांचे भाजपमध्ये स्वागत करण्यात आले.

या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्ह्य अध्यक्ष अविनाश कोळी, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष संतोष शर्मा, जिल्हा सरचिटणीस राजेश पांडेय, जिल्हा उपाध्यक्ष सुनील उपाध्याय आदींसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**पनवेल : भाजप पनवेल तालुका चिटणीसपदी यतिन भगवान पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, माजी पं.स.सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, कैलास मढवी, नंदू पाटील, शशिकांत शेळके आदी उपस्थित होते.**

# दागिने चोरणारे त्रिकुट ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एम.जी.एम. टपाल नाका येथे असलेल्या किरण ज्वेलर्स या दुकानातून आरोपी त्रिकुटाने दुकानदाराचा विश्वास संपादन करून त्याच्याकडील असलेली दोन लाख ३१ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन हातातून हिसकावून पसार झालेल्यांना पनवेल शहर पोलिसांनी सोन्याच्या चेनसह व गुन्ह्यात वापरलेल्या चार चाकी वाहनासह ताब्यात घेतले आहे.

शहरातील टपाल नाका एम.जी.रोड येथे असलेल्या किरण ज्वेलर्स या ठिकाणी रवींद्र घुले (वय २४), नितीन डमाळे (वय ३२) व रामकिशन ढाकणे (वय ३२) हे तिघे दुकानात येवून त्यांनी प्रकाशचंद्र शर्मा यांचा विश्वास संपादन करून त्या दुकानात असलेली दोन लाख ३१ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन ही सुनील सुखलाल याच्या हातातून हिसकावून ते त्यांच्या ताब्यात असलेल्या व्हॅगेनार गाडीतून पसार झाले होते.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, हवालदार अमोल पाटील, संदेश म्हात्रे, महेश पाटील, नाईक मिथुन भोसले, शिपाई विशाल दुधे, किरण कराड आदींच्या पथकाने त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक तपासाद्वारे या गुन्ह्यातील आरोपी हे पुणे परिसरात लपून बसल्याची माहिती मिळताच त्यांनी त्या ठिकाणी सापळा रचून या तिन्ही आरोपींना सोन्याची चेन व गुन्ह्यात वापरलेली व्हॅगेनार गाडीसह ताब्यात घेतले आहे.

या त्रिकुटापैकी रवींद्र घुले हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरुद्ध पाथर्डी पोलीस ठाणे, सोनाई पोलीस ठाणे, शेगाव पोलीस ठाणे, चकलंबा पोलीस ठाणे या ठिकाणीसुद्धा अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. याबाबत पुढील तपास सुरू आहे.

# मतदान जागृतीसाठी वासुदेव आला

## पनवेल महापालिकेचा उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

ग्रामीण भागात वासुदेवांच्या मदतीने समाजाची धुरा ही वाहिली जायची. वासुदेवांचे म्हणणे समाजाला पटायचं आणि ते व्यवहारातही आचरणातही यायचे. याचाच धागा पकडून पनवेल महापालिका प्रशासनाने आगामी होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदाराने १०० टक्के मतदानात सहभागी होऊन लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी वासुदेवांना प्राचारण केल आहे.

हे वासुदेव आपल्या पारंपारिक पेहरावात भजन कीर्तनाच्या तालावर मतदानाचे महत्त्व समाजाला पटवून देत आहेत अन कळंबोलीतील नागरिकांचे लक्ष ही वेधून घेत आहेत. वासुदेव आला हो वासुदेव आला, लोकशाहीच्या उत्सवाचा मतदान कराया, मतदान करून आपलं कर्तव्य कराया, वासुदेव आला हो वासुदेव आला अशी भूपाळी आता लोकशाहीच्या उत्सवात कळंबोलीतील रम्य पहाटे मतदारांच्या कानी पडत आहे .या वासुदेवांच्या आरोळीला अन भूपाळीला कळंबोलीतील नागरिक ही भरभरून प्रतिसाद देत आहेत.



या वासुदेवांचे म्हणणे एकच आहे की लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी सहभागी होऊन शंभर टक्के मतदान करून लोकशाही मजबूत आणि भक्कम करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊया प्रशासनाला मदत करूया सुरक्षित निर्भिक न आणि सुरक्षितपणे लोकशाहीचा उत्सव साजरा करूया. पनवेल महापालिकेने आयोजित केलेल्या वासुदेवांची ही भूपाळी कळंबोलीच्या आसंमंतात दुमदुमत आहे. पनवेल महापालिकेचे कर्तव्यदक्ष आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून या वासुदेवांचा सुयोग्य उपयोग हा समाजामध्ये मतदानातील जनजागृती व लोकशाही भक्कम करण्यासाठी केला जात असल्याने नागरिकांनीही त्याला भरभरून प्रतिसाद दिला आहे .महापालिकेच्या या अभिनव उपक्रमाचे पनवेलमधील नागरीक तेवढाच प्रतिसाद देत आहेत. यामुळे निश्चितच लोकशाहीचा उत्सव हा निर्भिक व सुरक्षित आणि आनंदात पार पडणार आहे.

वासुदेवांच्या भूपाळीकडे कळंबोलीतील नागरिक थांबून त्यांचं म्हणणं ऐकून घेत आहेत अन त्यांना वचनही देता येत की आम्ही निश्चितच लोकशाही भक्कम करण्यासाठी शंभर टक्के मतदान करून सजग नागरिक असल्याचे दाखवून देऊ. या वासुदेवांमध्ये कल्याण येथील श्रावस्ती नाट्य संस्था यामधील कलाकार सहभागी होत आहेत. त्यात भरतराज अर्जुन मोरे, सुदेश शिंदे, विकी वानखेडे, शंकर राजगुडे या वासुदेवांचे पात्र साकारणाऱ्यांचा सहभाग आहे.

# पनवेल शहर पोलिसांचा रूटमार्च

**पनवेल : वार्ताहर**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांचा शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी रुट मार्च करण्यात आला व मतदान शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल बस डेपो, लाईन आळी, जोशी आळी, आदर्श हॉटेल, जय भारत नाका, वीरुपाक्ष मंदिर, कापड बाजार, पनवेल महानगरपालिका, वाल्मिक नगर, परदेशी आळी, नित्यानंद मार्ग, साईनगर, नवनाथ नगर, आझाद नगर, लक्ष्मी नगर झोपडपट्टी, पनवेल रेल्वे स्थानक परिसर, तक्का गाव, फॉरेस्ट कॉलनी, रेल्वे कॉलनी आदी ठिकाणी रूटमार्च करण्यात आला.

या वेळी या पथकात जीपीचे पथक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार आदींसह गोपनीय विभाग पथक सहभागी झाले होते. या पथकाने परिसरातील महत्त्वाची मतदान केंद्रे तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाच्या ठिकाणी रूटमार्चदरम्यान पायी भेटी देवुन, त्यांना परीसर व परीस्थितीची माहिती घेतली.



# आशा सेविकांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिवाईन संस्कार रिसर्च फाउंडेशन ट्रस्टतर्फे आशा सेविकांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची मोफत तपासणी शिबिर १२ नोव्हेंबर रोजी नील हॉस्पिटल, सेक्टर १ नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आले.

या वेळी ३० वर्षे व त्या पेक्षा जास्त वयावरील आशा सेविकांची एचपीव्ही टेस्ट करण्यात आली. या टेस्टने गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंधक करता येतो. गर्भाशय मुखाचा कर्करोग टाळू शकतो का, यावर मार्गदर्शक बीके डॉ शुभदा नील स्त्रीरोग, कॅन्सर तज्ञ (टाटा हॉस्पिटल, मुंबई), गर्भ संस्कार तज्ञ, नील हॉस्पिटल नवीन पनवेल यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

ही टेस्ट करण्यासाठी तीन हजार रुपये खर्च असतो. नील हॉस्पिटल नविन पनवेल येथे, महानगर गॅस लिमिटेडच्या एम जी एल आरोग्य प्रोग्राम या सीएसआर प्रकल्पा अंतर्गत आयुजेन बायोसायांसेसची एचपीव्ही डीएनए चाचणी २९ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत मंगळवार, बुधवार, गुरुवार दुपारी १२ वाजता मोफत उपलब्ध आहे.

यासाठी ७९०००४७६९२ अथवा ९८३३८०१५७० येथे संपर्क करावा व जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शुभदा नील यांनी केले आहे.

## संपादकीय

# सहानुभूतीसाठी कांगावा

खासगी हेलिपॅडवर केली जाणारी बॅगांची तपासणी हा निवडणूक आयोगाच्या सर्वसामान्य नियमावलीचा भाग आहे. तरीही उद्धव ठाकरे यांना त्यात इतके वावगे का वाटले असावे? दोन्ही दिवसांच्या बॅग तपासणीचे व्हिडिओ समाजमाध्यमांवरून सर्वत्र पसरवून लोकांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न ठाकरे आणि त्यांच्या समर्थकांनी केला. हा विरोधकांना त्रास देण्याचा प्रकार आहे अशी ओरडही त्यांनी सुरू केली, परंतु या अशा खोटारड्या प्रचाराला आता जनता फसणार नाही.

**निवडणूक प्रचाराच्या काळात सर्वच शासकीय यंत्रणा कुठेही काही गैरप्रकार घडू नयेत म्हणून दक्ष असतात. ठिकठिकाणी नाकेबंदी, गाड्यांची तपासणी आदी सुरू असते. अलीकडच्या काळात निवडणूक आयोगाने अशाच कारवाईतून सुमारे पाचशे कोटी रूपयांची रोकड, दारू, सोने, चांदी आदी सामग्रीही हस्तगत केली आहे. या दक्षतेबद्दल खरे तर निवडणूक आयोगाचे कौतुक व्हायला हवे, परंतु गेले दोन दिवस उद्धव ठाकरे यांच्यासारखे ज्येष्ठ नेते त्यांच्या बॅगांची तपासणी झाल्यावर त्याविरोधात आगपाखड करीत आहेत. वणी मतदारसंघातील प्रचारसभेसाठी ठाकरे पोहोचले असता निवडणूक अधिकाऱ्यांनी हेलिपॅडवर त्यांच्या बॅगा तपासल्या. यावेळी ठाकरे यांनी संतापून संबंधित कर्मचाऱ्यांना जाब विचारला. नंतर जाहीर सभेतूनही त्यांनी बॅग तपासणीविरोधात आगपाखड केली. पहिल्याच दिवशी बॅग तपासणीनंतर ठाकरे यांनी 'माझी बॅग तपासली तशी मोदी-शहांची बॅग तपासली का' असा सवाल केला व गुर्मीची भाषा वापरली. कर्मचाऱ्यांना त्यांची नावे, गावाचे नाव आदी विचारून ओळखपत्र, नियुक्तीपत्र आदी दाखवण्याचे फर्मानही ठाकरे यांनी हेलिपॅडवर सोडले. एका ज्येष्ठ राजकीय नेत्याचे हे असे वर्तन संबंधित कर्मचाऱ्यांवर दबाव निर्माण करणारे ठरणार नाही का? ठाकरे यांनी संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ चित्रण करून ते समाजमाध्यमांवरून सर्वत्र पसरवले. दुसऱ्या दिवशी पुन्हा औसा येथे ते हेलिकॉप्टरने पोहोचले असता, पुन्हा त्यांच्या बॅगांची तपासणी अधिकाऱ्यांनी केली. तेव्हाही ठाकरे यांनी निव्वळ माझ्याच बॅगांची तपासणी का, असा सवाल केला. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्याही बॅगांची तपासणी करा असा जणु काही आदेशच त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना दिला. वास्तवत: ही अशी बॅग तपासणी हा सर्वसामान्य नियमावलीचा भाग असून तो सर्वांच्या बाबतीत सारखाच पाळला जातो. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, राज ठाकरे व अजित पवार या नेत्यांच्या बॅगांचीही तपासणी करण्यात आल्याचे व्हिडिओ अखेर बुधवारी समोर आलेच. आधीही या नेत्यांच्या बॅगांची तपासणी झाली असावी, परंतु उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणे त्यांनी त्याविरोधात आरडाओरडा केला नाही की अरेरावीची भाषाही केली नाही. महाविकास आघाडीच्या अन्य काही नेत्यांनी या प्रकारासंदर्भात उद्धव ठाकरे यांची बाजू घेत ते 'माजी मुख्यमंत्री' असल्याने त्यांचा योग्य तो मान राखला जायला हवा असे म्हटले. तर दुसरीकडे स्वत: ठाकरे यांनी दोन्ही दिवस स्वत:ची पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी तुलना करीत, माझ्या बॅगा तपासल्या तर आता त्यांच्याही बॅगा तपासा असे जणु काही आदेशच निवडणूक कर्मचाऱ्यांना दिले. पंतप्रधान पदावरील व्यक्तीचा अशा पद्धतीने उल्लेख करणे हे निश्चितच शोभनीय नाही. वास्तवत: निवडणूक काळात प्रशासकीय यंत्रणेसाठी सारेच नेते एकसारखेच असतात. या काळात कुणीही व्हीआयपी थाटात तपासणीपासून स्वत:चा बचाव करण्याचा आग्रह धरू नये.**

# रायगडात पक्ष्यांची अनोखी दुनिया; ४२८ प्रजाती





**खबरबात**
**धम्मशील सावंत**

महाराष्ट्रात ५ ते १२ नोव्हेंबर पक्षीसप्ताह साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यातील पक्षी वैभवदेखील समृद्ध आहे. रायगड जिल्हा भारतातील महाराष्ट्राच्या पश्चिम भागातील जैवविविधता आणि निसर्ग सौंदर्याने नटलेला एक जिल्हा आहे. येथे पक्ष्यांच्या ४२८ प्रजाती आढळतात. राज्य पक्षी हरियाल येथे सर्वत्र आढळतात. शिवाय तिबोटी खंड्या यासह विविध स्थलांतरित पक्षीदेखील येथे गुण्यागोविंदाने नांदतात. जिल्ह्यात कर्नाळा येथे पक्ष्यांसाठी पक्षी अभयारण्य आहे.

या वर्षी जिल्ह्यात दोन नवीन पक्ष्यांची नोंद येथे झाली आहे. त्यामुळे आता येथे ४२८ प्रजातीचे पक्षी आढळतात. कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्यासह जिल्ह्यातील सर्वच भागात विविध प्रकारचे पक्षी आढळतात. यामध्ये मलबार, गिधाडे, व्हिसलिंग थ्रश, कोकीळ, फ्लाय कॅचर, भोरड्या, तांबट, कोतवाल, पांढऱ्या पाठीची गिधाडे, दयाळ, शाहीन ससाणा, टिटवी, बगळे, तिबोटी खंड्या असे अनेक प्रकारचे व प्रजातीचे पक्षी आढळतात. दुर्मिळ प्रजातीच्या विविध पक्ष्यांचे दर्शनदेखील येथे होते. यात थोरला धनेश, मलबारी धनेश, राखी धनेश, मलबारी करडा धनेश यांचा समावेश आहे तसेच दुर्मिळ पांढऱ्या पाठीची गिधाडे व भारतीय गिधाडे येथे आहेत.

जिल्ह्याचे एकूण क्षेत्र सात हजार १४८ चौरस किलोमीटर इतके आहे. २००५च्या अहवालानुसार ३४.०६ टक्के जमीन वनांनी व्यापलेली आहे. जिल्ह्यातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जवळजवळ एक चतुर्थांश क्षेत्रावर वने आहेत. तब्बल २४० किमीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि जोडीला जैवविविधतेला आधार देणारी कांदळवनेदेखील आहेत. पूर्वेकडील सह्याद्री पर्वतरांगाचा प्रदेश किनाऱ्यालगतचा खलाटीचा प्रदेश व पूर्वेकडील डोंगराळ भाग यांच्यामधील मैदानी व सखल भाग आणि किनाऱ्यालगतचा खलाटीचा प्रदेश अशी जिल्ह्याची सर्वसाधारण स्वाभाविक रचना आहे. येथील काही भाग हा इकोसेन्सिटिव्ह झोन म्हणूनदेखील घोषित केला आहे. उरण तालुक्यात घारापुरी, अलिबाग येथील कार्लेखिंडजवळ व माथेरान येथे वनोद्याने आहेत. अशा सर्व पोषक वातावरण व परिस्थितीमुळे पक्ष्यांना खाद्य व अधिवास आणि प्रजनन यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. त्यामुळे येथे विविध प्रकारच्या पक्ष्यांचा किलबिलाट नेहमीच ऐकायला मिळतो.

**पक्षी अभयारण्य**

पनवेल तालुक्यात कर्नाळा येथे पक्ष्यांसाठी राखीव असलेले अभयारण्य आहे. कर्नाळा येथे निरनिराळ्या प्रकारचे वृक्ष असून येथे १५० जातींचे पक्षी आढळतात. यात मोर, बुलबुल, दयाळ, भारद्वाज, तितर, गरूड, घार, पोपट, सुतार पक्षी, कोतवाल, बहिरी ससाणा, शहाबाज इत्यादी जातींचे पक्षी आढळतात. येथे कायमच पक्षी अभ्यासक व निरीक्षकांचा राबता असतो. त्याबरोबरच पर्यटकांची गर्दी पहायला मिळते.

**पक्षी सप्ताहनिमित्त ई-छायाचित्र प्रदर्शन**

पक्षी सप्ताहनिमित्त रायगड जिल्ह्यातील वन्यजीव छायाचित्रकार आणि संशोधक शंतनु कुवेसकर यांनी टिपलेल्या पक्ष्यांच्या १०० निवडक छायाचित्रांचे रायगड जिल्ह्यातील समृद्ध पक्षी वैभव म्हणून ई-छायाचित्र प्रदर्शन ऑनलाईन आयोजित केले आहे. त्यास संपूर्ण महाराष्ट्रातून उदंड प्रतिसाद लाभत आहे. प्रदर्शन ऑनलाईन पाहण्यासाठी उपलब्ध असून सोबत प्रदर्शनाची पीडीएफ स्वरूपाची फाइलसुद्धा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून आपल्याला उपलब्ध करून दिली आहे. रायगड जिल्ह्यातील पक्षी विश्वाचा अमूल्य ठेवा या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहचत आहे.

**प्रदेशनिष्ठ पक्षी**

जिल्ह्यातील पक्षी व पर्यावरण अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले की, जिल्ह्यात २९ एक प्रकारचे पक्षी पश्चिम घाटात प्रदेशनिष्ठ आहेत. उदा. मलबारी व राखी धनेश, निलगिरी रानपारवा, करड्या डोक्याची मैना, पांढऱ्या गालाचा कुटूरगा आदी. भविष्यात हा अनमोल ठेवा असाच समृद्ध ठेवायचा असेल तर त्याचे संवर्धन व जतन करण्याची गरज आहे, असेदेखील प्रवीण कवळे यांनी सांगितले.

*तिबेटी खंड्या रायगड जिल्हा पक्षी म्हणून घोषित झाला आहे. जसे मधमाशा फुलपाखरे परागीभवन करतात तसेच काही जातीचे पक्षी परागभवन करतात, तर काही पक्ष्यांच्या विष्ठेमार्फत बियांची रूजन होते. त्यामुळे जैवविविधता अबाधित राहण्यास मोलाचे कार्य होते. येथे समृद्ध कांदळवन उपलब्ध आहे. या कांदळवनात विविध प्रकारच्या पक्षांचा अधिवास आहे. कांदळवन पर्यटनाच्या माध्यमातून विविध पर्यटक व अभ्यासक यांना येथील पक्ष्यांचे निरीक्षण व अभ्यास करता येतो. पश्चिम घाट निसर्ग व जैवविविधतेने नटलेले आहे. त्यामुळे देशातील एक नैसर्गिक समृद्धीने नटलेला जिल्हा आहे. येथे अनेक दुर्मिळ प्रजातीचे जीव व वनस्पती सापडतात. पक्ष्यांना खाद्य व अधिवास मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. वनविभाग तसेच निसर्गप्रेमी संस्था व पर्यावरणप्रेमी यांच्यामुळे येथील पक्षी, वन्यजीव व निसर्गाचा अमूल्य ठेवा टिकून आहे.*

**-समीर शिंदे,** वनक्षेत्रपाल, कांदळवन, अलिबाग

*रायगड जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या अतिशय निसर्गसंपन्न जिल्हा असून येथे घनदाट जंगले आहेत, नद्या आहेत, दलदलीचे प्रदेश आहेत, दक्खन पठारांप्रमाणे येथे मोठी पठारेदेखील आहेत, माळराने आहेत, सडे आहेत, कांदळवने, समुद्रकिनारे आहेत जेथे हजारो परदेशी स्थलांतरित पक्षी दाखल होत असतात. येथे अनेक अतिदुर्मिळ तसेच संवेदनशील पक्षी प्रजातींचे आणि प्राण्यांचे वास्तव्य आहे. येथील नैसर्गिक ठेवा जतन व संवर्धन करून ठेवला पाहिजे.*

**-शंतनु कुवेसकर,** पक्षी व वन्यजीव अभ्यासक, माणगाव

**गिधाडांचे संवर्धन**

प्रेमसागर मेस्त्री यांची सिस्केप संस्था मागील २० वर्षांहून अधिक काळापासून येथील गिधाडांचे संवर्धन व संरक्षण करीत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील गिधाडांची संख्या लक्षणीय वाढली आहे. याशिवाय विविध संस्थादेखील विधानांच्या संरक्षणासाठी आपले योगदान देत आहेत. वन विभागाचे कार्यदेखील उल्लेखनीय आहेत.

**वैज्ञानिक पद्धतीने पक्षीगणना**

ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि एसबीआय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महाराष्ट्र वन विभाग, ठाणे (वन्यजीव) विभाग यांच्या सहकार्याने फणसाड वन्यजीव अभयारण्य येथे २५ ते २७ ऑक्टोबर रोजी पक्षीगणनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या पक्षीगणनेत एकूण पाच राज्यांमधून ३५ पक्षी निरीक्षक; त्याचप्रमाणे ग्रीन वर्क्स ट्रस्टचे १५ स्वयंसेवक आणि १५ वनकर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. वैज्ञानिक पद्धतीने राबविल्या गेलेल्या या गणनेत एकूण १६६ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. पक्षीगणनेबरोबरच अभयारण्यातील इतर जैवविविधतेची नोंद सहभागी लोकांनी केली. त्यात एकूण ५१ प्रजातींची फुलपाखरे, १८ उभयचर प्राणी, नऊ सर्प प्रजाती तसेच १६ सस्तन प्राण्यांची नोंद झाली आहे.

**गिधाडांचे रेस्टॉरंट**

रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्यात चक्क गिधाडांसाठी एक रेस्टॉरंट आहे. ग्रीन वर्कस् ट्रस्ट ही बिगर शासकीय संस्था मागील काही वर्षे फणसाड वन्यजीव अभयारण्यामध्ये निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन व जनजागृती या विषयांवर कार्यरत आहे. फणसाड अभयारण्यात वनखात्याच्या माध्यमातून व्हल्चर रेस्टॉरंट (गिधाड आहार केंद्र) हे गिधाडांच्या संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठिकाण उभारले आहे. सन २०१४मध्ये या ठिकाणी २०-२५ गिधाडे पहाण्यात आली होती, मात्र त्यानंतर या ठिकाणी गिधाडे पाहण्यात आली नाहीत. तरी, या गिधाड रेस्टॉरंटचा मुख्य उद्देश, गिधाडांना या ठिकाणी आकृष्ट करणे हा आहे. यामुळे फणसाड अभयारण्यात गिधाडांचे पुनरुज्जीवन व संवर्धन होऊन त्यांच्यावर संशोधनदेखील होत आहे. या व्हल्चर रेस्टॉरंटचे कामकाज आणि त्याबाबत जनजागृती करण्याचे काम हे ग्रीन वर्कस् ट्रस्ट आणि एसबीआय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झाले आहे. या कार्यास महाराष्ट्र वनविभाग (ठाणे, वन्यजीव) यांचे मोलाचे सहकार्य व सहाय्य त्यांना लाभत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### युट्यूबवर सर्वात जास्त कोणत्या गोष्टी सर्च केल्या जातात?

अगदी प्रत्येक वयोगटातली लोक युट्यूबवरवर आपल्या आपल्या आवडीनुसार व्हिडीओ सर्च करून बघतात. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वचजण युटयूबवर व्हिडीओ पाहतात यावरून युट्यूबच्या लोकप्रियतेचा अंदाज लावता येतो. आपल्याला काहीही शोधायचे असेल किंवा काही शिकायचे असेल तर आपण लगेच युट्यूब उघडतो.

युट्यूबवर तुम्हाला प्रत्येक विषयावर अनेक व्हिडीओ मिळतील, जे तुम्ही तुमच्या आवडीनुसार आणि गरजेनुसार बघू शकता. युट्यूबवर काहीही शोधणे खूप सोपे आहे आणि यामुळेच आज आजी-आजोबांच्या वयातील लोक देखील युट्यूबवर चांगला वेळ घालवतात.

युटयूबवर अनेक गोष्टी सर्च केल्या जात असल्या तरी जर आपण सर्वाधिक सर्च केल्या गेलेल्या विषयाबद्दल बोलले, तर म्युझिक व्हिडीओचे नाव पहिले येते. लोक त्यांच्या आवडीनुसार आणि ट्रेंडनुसार युटयूबवर संगीत व्हिडीओ शोधतात.

आजकाल प्रत्येकाला आपली छोटी-छोटी कामे स्वतःहून पूर्ण करायची असतात. अशा परिस्थितीत DIY व्हिडीओ युटयूबवर खूप शोधले जातात, जिथे तुम्हाला घरच्या कामापासून ते केसांच्या काळजीपर्यंत सर्व काही घरबसल्या शिकायला मिळते.


गेमिंग व्हिडीओदेखील युट्यूबवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या गोष्टींपैकी एक आहेत. येथे तुम्हाला नवीन गेम आणि त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती सहज मिळू शकते.

सध्या युटयूबवर ब्लॉगिंगचा खूप ट्रेंड आहे. सेलिब्रिटींपासून सामान्य लोकांपर्यंत प्रत्येकजण येथे त्यांच्या दैनंदिन जीवनाबद्दल ब्लॉग बनवतो. लोकांना टाईमपास करण्यासाठी युट्यूबवर असे ब्लॉग पाहायला आवडतात.

मेकअप आणि हेअर स्टाइल व्हिडीओदेखील युट्यूबवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या गोष्टींपैकी एक आहेत. ज्याच्या मदतीने लोक पार्लरमध्ये न जाता घरी बसून पार्लरसारखा मेकअप आणि सुंदर हेअर स्टाइल करायला शिकतात.

युटयूबवरचा हल्ली लहान मुलांपासून मोठ्यापर्यंत या ना त्या गोष्टी शोधण्यासाठी वापर होतो, जे व्हिडीओ रूपाने उपलब्ध असते.

# प्रसिद्ध चित्रकार रघुवीर मुळगावकर



**निमित्त**

रघुवीर मुळगावकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९१८ रोजी गोव्यातील अस्नोडा येथे झाला. त्यांचे वडील शंकर मुळगावकर हेही चित्रकार होते. त्यांचे मूळ आडनाव राजाध्यक्ष होते. गावाच्या नावावरून त्यांनी ते मुळगावकर असे केले. शंकररावांनी गोव्यात चित्रकलेचा एक वर्ग चालवला होता. रघुवीर मुळगावकरांचा थोरला भाऊदेखील चित्रकलेत पारंगत होता, पण दुर्दैवाने तो अल्पायुषी ठरला. पुढे रघुवीर यांनी वडिलांचा चित्रकलेचा वारसा सांभाळला. मुळगावकरांच्या शेजारी प्रसिद्ध चित्रकार ए.एक्स. त्रिंदाद (त्रिनिदाद) राहत. लहानपणी रघुवीर त्यांची चित्रे न्याहाळत बसत असत. त्रिंदादांनीही या मुलातील कलागुण हेरले व शंकररावांना रघुवीरास चित्रकला शिक्षणासाठी मुंबईला धाडण्यास सांगितले.

रघुवीर मुळगावकर मुंबईला आले. त्या काळात चित्रकार एस.एम. पंडित यांचे नाव कलाक्षेत्रात प्रसिद्ध होते. चित्रपट, पोस्टर, कॅलेंडर या माध्यमांतून पंडितांची कला लोकांना परिचित होती. मुळगावकरांनी मुंबईला आल्यानंतर काही काळ एस.एम. पंडितांकडे काढला. मुळगावकरांनी एकलव्याप्रमाणे पंडितांचे काम न्याहाळत त्यांची शैली जवळून अभ्यासली.

नंतर मुळगावकर गिरगावात स्थायिक झाले. तेथे कुलकर्णी ग्रंथागार, केशव भिकाजी ढवळे, ग.पां. परचुरे, रायकर यांच्या प्रकाशनांच्या पुस्तकांच्या वेष्टनांची कामे मिळू लागली. तो काळ मराठी साहित्यातला सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. पुस्तके, नियतकालिके यांच्यासोबत कॅलेंडरही मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असत. बहुतांश देवदेवतांची असणारी त्यांवरील चित्रे मुळगावकरांच्या कुंचल्याने नटू लागली. पूर्वीच्या पिढीत राजा रविवर्म्याने देवदेवतांची चित्रे काढून घरोघरी चित्रकलासंस्कार पोहचवण्याचे जे काम केले, तेच मुळगावकरांनी पुढे नेले. प्रल्हाद केशव अत्रे, विनायक दामोदर सावरकर, पु.ल. देशपांडे, चिं.वि. जोशी, अ.वा. वर्टी यांच्यासह अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने सजली. त्याचप्रमाणे दीपलक्ष्मी, धनुर्धारी, वसंत, अनुप्रिता, नंदा, माधुरी, माणिक, अलका, पैंजण अशा अनेक नियतकालिकांची व त्यांच्या दिवाळी अंकांची मुखपृष्ठे मुळगावकरांच्या कुंचल्याने साकारली.

मुळगावकरांनी देवदेवतांप्रमाणे काही व्यक्तिरेखाही अमर केल्या. बाबुराव अर्नाळकरांचे धनंजय, छोटू, झुंझार-विजया, काळापहाड, धर्मसिंग, चारुहास आदी गुप्तहेर मुळगावकरांनी साकारले होते. दरमहा सहा कथा प्रसिद्ध होणाऱ्या या मालिकांना मुळगावकरांनी अशारितीने सादर केले की, धनंजय वगैरे पात्रे काल्पनिक असूनही वाचकांना ती खरीखुरी वाटत. मुळगावकरांनी कथाचित्रेही अमाप काढली. विशेषत: हाफटोनमधील वॉश चित्रे असोत वा सरळ रेषांमध्ये काढलेली रेखाचित्रे, कृष्णधवल रंगांतील त्यांची कथाचित्रे देखणी असत. या कृष्णधवल रंगांमध्ये अनेक पौराणिक व ऐतिहासिक चित्रमालिका त्यांनी प्रसिद्ध केल्या. त्यामध्ये गणेश पुराण, रामायण, महाराष्ट्रातील संत आदी मालिका लोकप्रिय झाल्या. संख्येने सुमारे पाच हजारांच्यावर चित्रसंपदा निर्माण करणार्या मुळगावकरांची 'स्प्रे' या माध्यमावर जबरदस्त पकड होती. त्यांनी या माध्यमाचा वापर मोठ्या कुशलतेने केला. त्यांच्या कामाचा झपाटादेखील मोठा होता.

त्यांची भावजय व प्रसिद्ध गायिका नलिनी मुळगावकर यांनी संपादलेल्या रत्नदीप दिवाळी अंकामध्ये त्यांनी कथाचित्रे व चित्रमालिका चितारणे आरंभले. पुढे त्यांनी स्वतःचा रत्नप्रभा हा अंक सुरू केला. या वार्षिकामधून त्यांनी आपली खास चित्रे रसिकांसमोर आणली. अशा या महान चित्रकाराचे ३० मार्च १९७६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : अभिजात स्थापत्यशैलीचा नमुना म्हणून दिवेआगर येथील नाराळी-पोफळीच्या कुशीत वसलेले शिलाहारकालीन रुपनारायण व सुंदर नारायण मंदिर प्रसिद्ध आहे. दिवेआगर येथे आलेले पर्यटक क्षणभर येथे विश्रांती घेतात. (छाया : अमेय नाझरे)**

## आरोग्य प्रहर

### सकाळच्या वेळी 'या' पेयाने करा दिवसाची सुरुवात



जसजसे हिवाळ्याचे महिने सुरू होतात, तसतसे सर्दी, घसा खवखवणे सुरू होते. झोपेतून उठल्यावर नाक बंद आणि घशात खरखरीत वाटणे अशा अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण दिवस खूप थकल्यासारखे होते. मग अशा वेळी सकाळी दिवसाची सुरुवात चहा-कॉफीने करण्याऐवजी एक कप लिंबू अन् लवंगाचे कोमट पाणी पिऊन बघा. खोकला आणि सर्दीसाठी हा एक घरगुती उपाय आहे; ज्याचे फायदे तुम्हाला आश्चर्यचकित करू शकतात.

हे साधे पेय सर्दीच्या लक्षणांपासून मुक्त करण्याप्रमाणेच वजन व्यवस्थापनासही साह्यभूत ठरू शकते का याबद्दल एमजीएम हेल्थकेअरच्या प्रमुख आहार व आरोग्य तज्ज्ञ विजयश्री एन. यांनी माहिती दिली.

तुम्ही सकाळी कॉफीची जागा लिंबू व लवंगयुक्त पाण्याने घेतल्यास तुम्हाला कॅफिन मिळणार नाही, पण त्या पाण्याचे स्वतःचे वेगळे फायदे आहेत. दूध व साखर असलेल्या एका सामान्य कॉफीमध्ये सुमारे १०० ते २०० कॅलरीज असतात; तर लिंबू व लवंगाच्या पाण्यात एक चमचा मध घातल्यास, त्या पेयात केवळ सुमारे २० कॅलरीज मिळू शकतात.

कॅलरीजचे सेवन कमी करणे हे तुमचे ध्येय असल्यास हे पेय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. याशिवाय लिंबू व लवंगाचे खूप फायदे आहेत. विशेषत: जेव्हा तुम्हाला सर्दीची लक्षणे जाणवत असतील किंवा घसा खवखवत असेल तर आणि थंडीची लक्षणे जाणवत असताना दिवसातून दोनदा म्हणजेच सकाळी आणि संध्याकाळी लिंबू व लवंगाचे पाणी पिण्याची शिफारस केली आहे.

**लिंबू व लवंगयुक्त पेय कसे बनवायचे?**

पाण्यात लवंग उकळून घ्या. लिंबाचा रस आणि मध घालण्यापूर्वी तुम्ही उकळवलेले पाणी थंड होऊ द्या. क जीवनसत्त्व टिकवून ठेवण्यासाठी आणि कडूपणा टाळण्यासाठी पाणी गरम असताना लिंबू घालणे टाळा. आरामदायक प्रभाव आणि संतुलित चवीसाठी एक चमचा मध घाला.

जर तुम्हाला सर्दी, खोकला किंवा घसा खवखवत असेल, तर साधारण सात ते १० दिवस दररोज हे पेय प्यावे. हे पेय तुम्ही सकाळी किंवा संध्याकाळी पिऊ शकता. पेप्टिक अल्सर, अन्ननलिका समस्या किंवा घशाची संवेदनशीलता असलेल्या व्यक्तींनी हा उपाय काळजीपूर्वक वापरावा.

# रोह्यात महायुतीची भव्य प्रचार सभा

## आमदार रविशेठ पाटील यांच्या विजयाची खात्री –धैर्यशील पाटील

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सोनगाव येथे १९१ पेण, पाली, रोहा मतदार संघाचे अधिकृत महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांनी बुधवार (दि.१३) रोजी सभा झाली. या सभेला खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवीशेठ पाटील माजी आमदार अनिकेत तटकरे यांची उपस्थिती लाभली. या वेळी त्यामुळे रविशेठ पाटील यांच्या विजयाची खात्री आहे. सरकारने केलेले कामे टिकून ठेवण्यासाठी येथील जनताच येत्या २० तारखेला कमळ या चिन्हावर बटन दाबून प्रचंड बहुमताने निवडून देतील, असा विश्वास खासदार धैर्यशील पाटील यांनी व्यक्त केला.



या वेळी खासदार धैर्यशील पाटील त्यांनी उपस्थित लोकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, या विभागात खासदार सुनिल तटकरे, आमदार रविशेठ पाटील, मंत्री अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे व माझ्या माध्यमातून या विभागात कोट्यावधी रुपयांची विकासकामे करण्यात आलेली आहेत. केंद्रात आपली सत्ता आहेच, परंतु राज्यात गेल्या अडीच वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून गरीब कल्याणकारी अनेक योजना आणलेला आहेत. आता थेट फायदा माझ्या कष्टकरी शेतकरी, महिलांना होत आहे. विशेष करून लाडकी बहीण योजना राज्य सरकारने उत्तमरीत्या राबवल्यामुळे महिलांच्या हातात चार पैसे आले. महिला उद्योग धंदे करू लागल्या, त्यांच्या प्रगतीत वाढ व्हायला लागली त्यामुळे खऱ्या अर्थाने महिलाचा सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे.

या विभागात तटकरे कुटुंबियांची गेल्या चाळीस वर्षांपासून जनतेशी ऋणानुबंध आहेत. येथे नेहमीच राष्ट्रवादी विरुद्ध शेकापसा संघर्ष असायचा, परंतु येथील जनता तटकरे यांच्या पाठीशी राहिलेले आहे. त्यामुळे या विभागात रस्ते, पाणी, लाईट अशी कोट्यावधी रुपयांची अनेक विकास कामे खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून झालेली आहेत. खासदार सुनील तटकरे निवडणुकीत या नऊ ग्रामपंचायतीने या विभागाने जवळपास २२०० मतांची लीड दिली. त्यामुळे पुन्हा एकदा सर्व ताकतीने राष्ट्राच्या प्रत्येक कार्यकर्ता ज्या पद्धतीने खासदारकीच्या निवडणुकीत ताकतीने काम करत होता त्याच पद्धतीनेदेखील रवीशेठ पाटील यांच्या निवडणुकीत करतील. सर्व महायुतीचे पदाधिकारी एकत्रित प्रचार करीत आहेत. त्यामुळे निश्चितच विरोधकांना मत काढण्याचे संधी मिळणार नाही. त्यामुळे आपोआप त्यांच्या डिपॉझिट जप्त होईल, असे माजी आमदार अनिकेत तटकरे म्हणाले.

या पेण मतदारसंघातील विभागातील १९९५ सालापासून सर्व गावांशी माझे संबंध आहे. इथे विकास निश्चित झालेला आहे. या सरकारच्या माध्यमातून लाडकी योजना आणल्यामुळे याचा उपयोग संसारात चांगल्या पद्धतीने होतोय. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा सन्मान केला जातोय वर्षाला सहा हजार केंद्र सरकार व सहा हजार राज्य सरकार देत आहे. तसेच सर्व घटकांना योग्य तो न्याय देण्याचा काम या सरकारने केलेला. बाजारात रोजचा रोज कोट्यवधी रुपयाची उलाढाल होत असल्यामुळे अर्थव्यवस्था चांगल्या मार्गाने आपली प्रगती पथावर आहे. त्यामुळे येथील संपूर्ण मतदाराचा मला पाठिंबा असल्यामुळे माझा निश्चित न भूतो न भविष्य असा विजय होईल, असा विश्वास त्यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते अनंता देशमुख, जेष्ठ नेते आप्पा देशमुख, संदीप चोरगे, राजू पोकळे, सोपान मोहिते, युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, भाजप महिला चिटणीस श्रद्धा घाग, रोहा शहर अध्यक्ष भाजपा यज्ञेश भांड, शिवसेना सदस्या वैभवी भगत, नवनीत डोलकर, भाजप नेत्या भांड ताई, धनश्याम कराळे तंटामुक्त अध्यक्ष उडदवणे, सरपंच मारुती तुपकर, उपसरपंच निलेश मालुसरे, माजी सरपंच हेमंत मालुसरे, उपसरपंच योगेश शिंदे, ग्रामपंचायत सदस्या कविता शेलके, संतोष गायकर, रवींद्र मोहिते, निलेश जंगम, हेमंत कडव, भाजपचे सुमित जंगम, सुदेश साळुंखे, शुभम मोहिते, अनिल खंडागळे तसेच शिंदे शिवसेना माजी सरपंच शंकर काते यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचा मंत्री आदिती तटकरे यांना पाठिंबा

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यासह राज्यभरात लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे संघटनात्मक प्रस्थ मोठे आहे. अशातच श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आदिती तटकरे यांना सर्वस्तरांतून पाठिंबा मिळत आहे. त्यांना आता लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांनी आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.



या पाठिंबापत्रात म्हटले आहे की, गेली अनेक वर्षे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे लोकसेवक आदिती तटकरे यांना लोकशक्ती संजिवनी प्रतिष्ठान (महाराष्ट्र शासन नोंदणीकृत) संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय अनुसया राजाराम सोनावणे यांच्या आदेशाने जाहीर पाठिंबा देत आहोत. या मतदारसंघात मागील अनेक वर्षांत आमूलाग्र बदल होत आहे. जनतेला आवश्यक त्या मूलभूत पायाभूत नागरी सेवासुविधा उपलब्ध करून देण्यात तटकरे यशस्वी झाल्या आहेत. पर्यटनावर आधारित रोजगार निर्माण करण्यावर भर देणे, त्यातच विकसित, प्रगतशील महाराष्ट्राकडे वाटचाल करताना श्रीवर्धन मतदारसंघाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे स्वप्न पाहताना मतदारसंघात अनेक विकासकामे त्यांच्या दूरदृष्टीने होत आहेत.

या मतदारसंघाचा विकास त्यांच्या नेतृत्वाखाली अधिक जलद व्हावा म्हणून आम्ही या पत्राद्वारे त्यांना जाहीर पाठिंबा दर्शवत आहोत. या वेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय सोनावणे यांचे मनापासून स्वागत करतो की, त्यांनी विधायक काम करणाऱ्या व्यक्तींना पाठिंबा जाहीर केला आहे. आम्ही त्यांना विश्वास देतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान दिले आहे त्या संविधानिक मूल्यांची जोपासना करीत त्याच मार्गावर वाटचाल करून मतदारसंघाचा परिपूर्ण विकास करू, त्यांचे स्वागतच आहे. तर आदिती तटकरे यांनी या पाठिंब्यानंतर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय सोनावणे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे यांचे आभार मानले आहेत. लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली, त्यांच काम समाज हिताचे व दिशादर्शक आहे. त्यांनी मला पाठिंबा दिला याचा आनंद व समाधान आहे, असाच पाठिंबा व आशीर्वाद कायम मिळावा ही अपेक्षा आहे, असे आदिती तटकरे म्हणाल्या.

पाठिंबा पत्र देतेवेळी लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय सोनावणे, कार्याध्यक्ष स्वराज सोनावणे, उपाध्यक्ष निलेश सोनावणे, आरोग्य विभाग प्रमुख राजेंद्र शेठ, राज्य सचिव कामगार आणि क्रीडा विभाग राजेंद्र वाढवळ, उपाध्यक्ष खेमराज रावळ, शिक्षण विभाग प्रमुख सुधाकर पालकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख मिलिंद शेठ, उपाध्यक्ष शरद सोनावणे आदी उपस्थित होते.

# आमदार रविशेठ पाटील यांना नागोठण्यातून मताधिक्य मिळवून देणार –शिंदे

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशाने आमदार रविशेठ पाटील यांना नागोठणे विभागातून जास्तीतजास्त मतदान मिळवून देणार, असा विश्वास नागोठणे विभागातील राष्ट्रवादीचे नेते शिवरामभाऊ शिंदे यांनी नागोठणेजवळील पळस येथील गावबैठकीत व्यक्त केला.

शिवरामभाऊ शिंदे यांनी पळस शेतपळस या गावांतील मतदानाचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, नागोठणे विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पेण सुधागड विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी जोमाने कामाला लागा असा आदेश आमचे नेते राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिले असल्यामुळे नागोठणे विभागातील सर्व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. नागोठणे विभागातील गावोगावी आदिवासी वाड्या येथे जाऊन गाव बैठक घेऊन आमदार रविशेठ पाटील व महायुतीने केलेले विकासकामे ग्रामस्थांना समजावून सांगत आहोत.



पळस व शेतपळस असे दोन बूथ असून यामध्ये शेतपळस, पळस, वाघळी, बाहेरशीव, पळस आदिवासी वाडी व बाहेरशीव आदिवासी वाडी ही गावे येतात. पळस या बूथवर एकूण ११०० मतदान आहे व शेतपळस या बूथवर ५०० मतदान आहे. लोकसभा निवडणुकीत पळस बूथवर ७०० मतदान झाले त्यापैकी खासदार तटकरे यांना ५०० मतदान मिळाले व शेतपळस बूथवर ४०० मतदान झाले त्यापैकी खासदार तटकरे यांना २५० मतदान मिळाले. या वेळी आम्ही या दोन बुथवर लोकसभेपेक्षा जास्त मतदान आमदार रविशेठ पाटील यांना मिळवून देणार आहोत. नागोठणे विभागात महायुतीचे वर्चस्व असून नागोठणे विभागात खासदार तटकरे साहेबांना ४५०० मतांची आघाडी दिली होती आता या विधानसभेत आमदार रविशेठ पाटील यांना ४५०० मतांपेक्षा जास्त आघाडी देऊ, असा विश्वास व्यक्त करून शिवरामभाऊ शिंदे पुढे म्हणाले की, आमदार रविशेठ पाटील हे दोन वेळा आमदार व एक वेळा मंत्री राहिलेले आहेत त्यामुळे त्यांनी पेण सुधागड मतदार संघात विकासकामे चांगली केलेली आहेत. त्यांनी जवळजवळ सात ते आठ वेळेस विधानसभा निवडणूक लढविलेली आहे त्यामुळे ते सर्वांच्या परिचयाचे आहेत. गावागावातील जनतेचे रविशेठ पाटील यांच्यावर प्रेम आहे त्यांचेदेखील प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे नाते आहे.

या विधानसभा निवडणुकीत आमदार रविशेठ पाटील यांना खासदार सुनिल तटकरे व खासदार धैर्यशील पाटील यांची मोलाची साथ मिळालेली आहे. त्यामुळे आमदार रविशेठ पाटील भरघोस मताधिक्याने विजयी होणार, असा विश्वास शेवटी शिवरामभाऊ शिंदे यांनी पळस येथील गाव बैठकीत व्यक्त केला.

# वाहतुकीचे नियम भंगप्रकरणी कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१२) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २७१ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून दोन लाख २७ हजार ३०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# श्रीवर्धनमध्ये आदिती तटकरे यांची प्रचारामध्ये आघाडी; घरोघरी भेटी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यामध्ये महायुतीच्या उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे यांनी प्रचारात खूप मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. आदिती तटकरे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांसह श्रीवर्धन शहरातील प्रत्येक आळी, पाखाडी पिंजून काढली.



मतदारांजवळ थेट संपर्क साधून प्रचार केला. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये श्रीवर्धन मतदारसंघामध्ये त्यावेळच्या एकसंघ असलेल्या शिवसेनेचे उमेदवार विनोद घोसाळकर हे आदिती तटकरे यांच्यासमोर उभे होते, परंतु तरीही आदीती तटकरे यांनी जवळजवळ ४० हजार मतांनी विजय संपादन केला होता.

आजपर्यंत श्रीवर्धन मतदारसंघात झालेल्या प्रत्येक वेळेच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही पक्षाने किंवा उमेदवाराने एवढ्या मोठ्या फरकाने विजय संपादित केला नव्हता. २००९ साली मतदार संघाच्या पुनर्रचना झाल्यानंतर विद्यमान रायगडचे खासदार सुनील तटकरे हे २००९ साली प्रथम श्रीवर्धन मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले व त्यांना महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

या संधीचे सोने करत सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन तालुक्यात अनेक विकास कामे केली. ७५२ लांब असलेल्या कोकण किनारपट्टीवरील एकाही समुद्रकिनाऱ्यावर नसलेला, अंदाजे तीन किलोमीटर लांबीचा धूप प्रतिबंधक बंधारा श्रीवर्धन समुद्रकिनारी बांधण्यात आलेला आहे. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती विविध शोभेची झाडे, त्याचप्रमाणे बसण्याची व्यवस्था व विद्युत रोषणाईदेखील करण्यात आलेली आहे. याशिवाय श्रीवर्धन येथे उपजिल्हा रुग्णालयात, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, मध्यवर्ती प्रशासकीय भवन, नगर परिषद इमारत, रस्ते इत्यादी कामे झाली.

श्रीवर्धन विधान सभा मतदार संघामध्ये आदिती तटकरे यांना टक्कर देईल असा उमेदवार कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला न सापडल्याने आदिती तटकरे यांचा विजय निश्चित मानला जात आहे. आदिती तटकरे यांच्या काळातसुध्दा अनेक ठिकाणी विकासकामे करण्यात आली आहेत.

प्रचार दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, श्रीवर्धनचे शहर अध्यक्ष जितेंद्र सातनाक, राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्ष राजसी मुरकर, श्रीवर्धन शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे, उपशहर प्रमुख सावंत तवसाळकर, युवा शहर प्रमुख अजय चव्हाण, महिला तालुकाप्रमुख सुप्रिया कर्देकर, युवा महिला संघटक सलोनी मोहित यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट व भाजपचे असंख्य कार्यकर्ते प्रचारामध्ये सहभागी झाले होते.

# पेण अर्बन बँक संघर्ष समितीचा आमदार महेंद्र थोरवे यांना पाठिंबा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना पेण अर्बन बँक संघर्ष समिती कडून पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी पेण बँकेचे ठेवीदार यांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नेवून पेण बँकेच्या ठेवीदारांचा विषय मांडला होता.



पेण अर्बन बँक संघर्ष समितीने आपल्या ठेवीदार यांच्यासह कर्जत येथे महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. आमदार थोरवे यांच्या निवासस्थानी पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे सदस्य प्रदीप शहा, मोहन सुर्वे, बिपिन शहा, बोभाटे, आदींनी आमदार थोरवे यांची भेट घेतली. त्यावेळी शिवसेना उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर हेदेखील उपस्थित होते. या वेळी पेण अर्बन बँक संघर्ष समिती आणि ठेवीदारांच्या संघटनेने आमदार महेंद्र थोरवे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला.

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांच्या हक्कासाठी संघर्ष समितीचे पदाधिकाऱ्यांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे घेऊन गेले होते. तेथे आमदार थोरवे यांनी पेण अर्बन बँकेचे कर्जत विधानसभा मतदारसंघातील ९० हजार ठेवीदार यांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांनी केलेल्या प्रयत्नांची पेण अर्बन बँक समितीने प्रशंसा केली आहे.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– kbmc123@gmail.com वेबसाईट :– http://kbmc.gov.in

जा.क्र. :– कु.ब.न.प./आरोग्य/१६६/२०२४–२५ दि. १३/११/२०२४.

**GFC (३ स्टार) जाहीर प्रकटन**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये GFC (३ स्टार) करिता शासनामार्फत दिलेल्या निकषानुसार कुळगांव–बदलापूर शहर GFC (३ स्टार) असल्याचे स्वयंघोषित करण्यात येत आहे.

सही/
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– kbmc123@gmail.com वेबसाईट :– http://kbmc.gov.in

जा.क्र. :– कु.ब.न.प./आरोग्य/१६६/२०२४–२५ दि. १३/११/२०२४.

**ODF++ जाहीर प्रकटन**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये ODF++ करिता दिलेल्या निकषानुसार कुळगांव–बदलापूर शहर ODF++ बाबत कुळगांव–बदलापूर नगरपरिषद हद्दीतील एकूण १ ते ४७ वॉर्ड ODF++ म्हणून स्वयंघोषित करण्यात येत आहे.

सही/
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव



**REPLY TO PUBLIC NOTICE ISSUED BY M/s AMP BUILDERS AND DEVELOPERS LLP**

Notice is hereby given to public at large that my client Mr Narayan Sadashiv Gharat and Mr Gajanan Sadashiv Gharat residing : Karnjade, Pushpak-Wadghar Node, Taluka Panvel, District Raigad. are the co-owner of the property mentioned below.

**Description of Plot**

| Node | Plot No | Sector No | Area in Sq Mt |
|---|---|---|---|
| Pushpak Nagar, Dapoli | 18+19 | 4 | 3440 |

It has come to knowledge of my client that M/s AMP Builders and Developers LLP through its partners Mr. Maruti Padaji Patil, and Mrs. Nirmala Maruti Patil having its office at Shop No.2, Nav Varun CHS Ltd, Plot No. 310, Sector 21, Nerul (E), Navi Mumbai 400706. Have issued a Public Notice dated 30/10/2024 in Lokmat and on 09/11/2024 in Vashi Times respectively through its Advocate Mr. Sachin Tambat. This notice is the reply to caution Notice Published by M/s AMP Builders and Developers LLP.

In respect of the above published notice my client would like to inform in Public that M/s AMP Builders and Developers LLP have no right in the above property thus the public notice issued is vague and hazy and not binding on my client. As per the oral agreement between M/s AMP Builders and Developers LLP and my client it was agreed by M/s AMP Builder and Developer that they will develop the plot, but as M/s AMP Builder and Developer was not capable and in position to develop the plot, thus my client has issued notice to M/s AMP Builder and Developer for cancellation of oral Agreement and to refund the amount to AMP Builder and Developer.

Thus my client is at liberty to develop the plot on his own or may enter into agreement with any third party to develop the plot my client informs in public that if my client enters into agreement with any third party to develop the plot, the third party will not have risk or anxiety to enter into agreement with my client. M/s AMP Builder and Developer has no right or title in the plot.

Date : 13/11/2024 Yours truly

Sd/-
ADVOCATE SUDESH K. KENE
ADVOCATE HIGH COURT
002, Ground Floor, Pride CHS Ltd., Sector-11, Plot No.5, New Panvel, Pin-410206.

# फरार आरोपींना पनवेलमध्ये अटक

## ओशिवरा पोलिसांच्या दिले ताब्यात; तपास सुरू

**पनवेल : वार्ताहर**

महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांनी बृहन्मुंबई पोलीस दलातील ओशिवरा पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यातील आरोपींना गुन्ह्यातील मुद्देमालासह पकडले असून त्याला अधिक तपास करून ओशिवरा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

ओशिवरा पोलीस ठाणे येथे एक गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्यामध्ये अपहार झालेली क्रेटा कार (एमएच ०२ एफयु ३५३४) मुंबई कडून पुणे बाजूकडे प्रवास करीत असलेबाबत नियंत्रण कक्ष, महामार्ग पोलीस (म.राज्य) मुंबई कडील नियंत्रण कक्ष अधिकारी यांनी महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पे प्रभारी अधिकारी वैभव रोंगे यांना कळविण्यात आले. त्याअनुषंगाने ओशिवारा पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक बर्वे यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधुन तांत्रिक तपासाद्वारे लोकेशन प्राप्त केले असता ते पनेवलजवळील अमेटी कॉलेज तसेच आजुबाजुच्या गावांमध्ये फिरत होते व ते परत एक्सप्रेस वे वर आल्यावर वाहनाचा पाठलाग करून कि.मी. ६.५०० मुंबई लेनवर अपहार झालेली क्रेटा कार व संशयीत आरोपी मोहम्मद साकिब वसीम मुल्ला, (वय २२, हारुन कम्पाउंड, कुर्ला) व त्याचे तिन साथीदार यांना ताब्यात घेतले.



संशयीत आरोपी व क्रेटा कार ही ओशिवरा पोलीस ठाण्याकडील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक बर्वे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे प्रभारी अधिकारी वैभव रोंगे यांच्या नेतृत्वखाली हवालदार मच्छिंद्र जाधव, विजय भगत, अमित परदेशी, नाईक अनिल पारधी, नवनाथ जाधव, शिपाई अरुण जाधव यांनी केली आहे.

# मसाला बाजारातील बंद पाणपोई सुरू करा

## वाहतूकदार, कामगार घटकांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उन्हाळा वाढत असल्याने किमान तहान भागवण्यासाठी पाणी मिळणे सर्वांना अपेक्षित आहे. याच साठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समित्तीच्या पाच ही बाजारात पाण्यासाठी कुलर आणि पाणपोई बसविण्यात आले आहेत, मात्र देखभाली अभावी सध्या मसाला बाजारातील पाणपोई सहा महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे बाजारातील कामगार, हमाल शिवाय बाहेरून येणाऱ्यां वाहतूकदार यांनाही पिण्यासाठी पाणी मिळत नाही.



दोन घोट पाण्यासाठी ही पाण्याची बाटली विकत घ्यावी लागत आहे. दररोज हा खर्च हमाल, माथाडी कामगार यांना परवडणारा नाही. त्यामुळे बाजार आवारातील पाणपोई ची सुविधा सुरू करावी अशी मागणी वाहतूकदार, कामगार घटकांनी केली आहे.

बाजारात व्यापार करणारे व्यापारी, उन्हात काम करणारे हमाल माथाडी, गाड्या घेवून येणारे ट्रक चालक त्या वरील कामगार आणि खरेदीसाठी येणारे खरेदीदार असे सर्व घटक पिण्याच्या पाण्यासाठी या पाणपोई वर अवलंबून असतात. मसाला बाजारात दिवसाला सरासरी, दीड दोन हजाराच्या आसपास लोक येत असतात शिवाय बाजारात काम करणारे हमाल, माथाडी कामगार, बाजारात काम करणारया महिला कामगार यांना ही या पाणपोईच्या पाण्याचा आधार होता, मात्र मसाला बाजारात बसवण्यात आलेली पाणपोई सहा महिन्यांपासून बंद आहे. बाजार समिती प्रशासनाला ती सुरू करण्यात काहीही स्वारस्य नाही. त्यामुळे या कामगार घटकांना पिण्याच्या पाण्यासाठी धावाधाव करावी लागते.

बाजारातील व्यापाऱ्यांच्या कडून पाणी घ्यावे लागते किंवा विकतचे बाटली बंद पाणी विकत घ्यावे लागते. दररोज हा आर्थिक भुर्दंड सहन करने कामगाराना शक्य नाही. त्यामुळे या बाबत नाराजी व्यक्त होत आहे आणि लवकरात लवकर ही पाणपोई सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, याबाबत बाजार समिती उप सचिव एम एस शिंगाडे, सय्यक सचिव इनामदार यांना ही विचारले असता त्यांना याबाबत समाधान कारक उत्तर देता आले नाही. बाजाराचे संचालक विजय भुता यांना विचारले असता तेथील मुख्य सुविधा इमारत धोकादायक झाल्याने तेथील पाणी बंद असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार पाणपोई बंद असावे, अशी माहिती दिली.

## निवडक

### नवी मुंबईत लाखोचा गांजा जप्त

**नवी मुंबई :** एपीएमसी पोलिसांनी ग्रीनपार्क झोपडपट्टीमधून एक लाख सात हजारांचा गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी करण पप्पू गायकवाड (वय २२) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विक्रीसाठी त्याने गांजाची साठवणूक केली होती. एकीकडे पोलीस सातत्याने गांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करत असताना दुसरीकडे, गांजा विक्री थांबत नसल्याचे चीन्ह आहे. याउलट शहरात खुलेआम युवावर्ग गांजाच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे युवा पिढी बरबाद होत आहे. पोलिसांना गांजाच्या विक्रीवर अंकुश ठेवण्यात अपयश आल्याची चर्चा नवी मुंबईत घडू लागली आहे.

### चोरलेल्या मोबाइलद्वारे लूट

**नवी मुंबई :** चोरीला गेलेल्या मोबाइलचा वापर करून अज्ञाताने वृद्धाच्या बँक खात्यातली रक्कम हडपल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशी सेक्टर १० परिसरात राहणाऱ्या श्रीकांत क्षीरसागर (वय ६९) यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांचा मोबाइल चोरीला गेला होता. त्यामध्ये त्यांचे बँकेचे ॲप्लिकेशन होते. या ॲप्लिकेशनचा वापर करून अज्ञात व्यक्तीने त्यांच्या बँक खात्यातील ९० हजार रुपयांचा अपहार केला आहे. हा प्रकार निदर्शनात आल्यानंतर त्यांनी वाशी पोलिसांकडे तक्रार केली आहे.

### जवानालाच १० लाखांचा गंडा

**नवी मुंबई :** ट्रेडिंगच्या बहाण्याने चक्क सीमा सुरक्षा बलाच्या जवानाची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. ट्रेडिंगबद्दल कोणतीही माहिती नसताना त्यांनी अज्ञातांच्या सांगण्यावरून ऑनलाइन १० लाख ७४ हजार गुंतवले. ही रक्कम त्यांना परत न करता फसवणूक झाल्याप्रकरणी कोपर खैरणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. कोपर खैरणे परिसरात राहणाऱ्या सीमा सुरक्षा बलाच्या जवानासोबत हा प्रकार घडला आहे. त्यांना ऑनलाईन ट्रेडिंग करून अधिक नफा कमावण्याची माहिती सोशल मीडियाद्वारे मिळाली होती. त्याला भुलून ते एका ग्रुपमध्ये सहभागी झाले असता त्या ठिकाणी त्यांना ट्रेडिंगच्या नफ्याची माहिती देण्यात आली होती.

### उरण येथे मोफत आरोग्य शिबिर

**उरण :** भारतीय नौदलाच्या नेव्ही विक सेलिब्रेशन २०२४ चा एक भाग म्हणून खछ्व्क्ड संधानी आणि नेव्हल स्टेशन करंजा यांच्या संयुक्त विद्यमाने उरण आणि परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य सेवा व सल्ला देण्यासाठी मोफत आरोग्य शिबिर गुरुवार (दि. १४) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूल, पालक मैदान उरण येथे ठेवण्यात आले आहे. शिबिरात शल्य चिकित्सक, स्त्री रोग तज्ञ, बालरोगतज्ञ एछ्ढ विशेष तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, त्वचा रोग तज्ञ, आदी डॉ. तपासणी करून मोलाचे सल्ला देणार आहेत. वाचन चष्मा आणि रक्त तपासणी मोफत करण्यात येईल.

# गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत लूट

**नवी मुंबई : बातमीदार**

पोर्नोग्राफीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचा आरोप करून एका महिलेचे एक कोटी ८४ लाख रुपये लुटल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

उलवे परिसरात राहणाऱ्या महिलेसोबत हा प्रकार घडला. या महिलेला अज्ञात व्यक्तींनी संपर्क साधून त्यांचा पोर्नोग्राफी, तसेच इतर गंभीर गुन्ह्यात सहभाग असल्याचा आरोप केला, तसेच या गुन्ह्यात सीबीआयमार्फत चौकशी सुरू असून कारवाई करणार असल्याचीदेखील भीती दाखवली. यासाठी संबंधितांनी त्यांना सतत फोन करून मानसिक त्रास दिला.

गुन्ह्यात चौकशीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करून त्यांच्या बँक खात्यातील रक्कम एका खात्यात वळवायला सांगितले. त्यांच्यावर विश्वास ठेवून महिलेने तिच्या खात्यातले एक कोटी ८४ लाख रुपये संबंधिताच्या खात्यावर पाठवले होते.

यानंतर त्यांनी संपर्क तोडला असता, फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी महिलेने तक्रार केली असून अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे.

# हॉटेलच्या मालकाला तलवारीने धमकी

## आरोपी ताब्यात

**पनवेल :** शहरातील कोकण फुड हॉटेल येथील मॅनेजरला एका सराईत गुन्हेगाराने त्याच्याकडे असलेल्या तलवारीने धमकावून दर महिन्याला हप्ता देण्याची मागणी केली. याप्रकरणी शहर पोलिसांनी कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

तकदीर साळुंखे (रा. नवनाथनगर झोपडपट्टी) याने त्या परिसरात असलेल्या कोकण फुड हॉटेलचा मॅनेजर चंदन श्यामराव (वय ३४) याच्याकडे फुकटची बिअर मागितली असता बिअर देण्यास मॅनेजरने नकार दिल्यावर त्याने मॅनेजरला शिवीगाळ व धक्काबुक्की करून स्वॅप मशिन फिर्यादीला फेकून मारले. यासोबतच हातामध्ये तलवार घेवून हॉटेलमध्ये घुसून धमकाविल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार अविनाश गंथडे, नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, अमोल डोईफोडे, अमोल पाटील, नाईक विनोद देशमुख, चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने आरोपीला तलवारीसह ताब्यात घेतले आहे.

# कर्करोगासंबंधीत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या वतीने मोफत तोंडाचा कर्करोग व कर्करोग-पूर्व जखमा तपासणी शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.२३) करण्यात आले आहे. या शिबिराचा उद्देश तोंडाच्या कर्करोगाबद्दल जनजागृती करणे हा आहे. योग्य वेळी निदान झाल्यास हा कर्करोग बरा होऊ शकतो, असा संदेश याद्वारे द्यायचा आहे.

हे शिबिर तंबाखूचे सेवन करणार्या व्यक्तींसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. सिगारेट, बिडी, गुटखा किंवा धूरविरहित तंबाखू, तसेच स्वयंप्रतिकार आजार व तोंडाच्या स्वच्छतेचे अभाव असलेल्या व्यक्तींमध्ये कर्करोगाचे धोकादायक लक्षणे आढळू शकतात. आपण किंवा आपल्यातील कोणीतरी तंबाखूचा वापर करत असेल किंवा तोंडाशी संबंधित कोणतीही तक्रार असेल, तर आजच तपासणी करून आपले आरोग्य सुरक्षित ठेवा, असे आवाहन करण्यात आले.

हे शिबिर २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत पटवर्धन हॉस्पिटल पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी व रजिस्ट्रेशनसाठी ९३२१६३६४९७ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांकडून मतदान जागृती प्रभातफेरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार कर्तव्य भावनेने बजवावा यासाठी मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम अर्थात स्वीप अंतर्गत उरण विधानसभा मतदारसंघातल्या वासांबे मोहोपाडा येथील कांबे राजिप शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती प्रभातफेरी काढून मतदान करावे, असे आवाहन केले.

रा.जि.प.शाळा कांबेच्या मुलांनी मतदान कराच, असे आवाहन रॅलीतून केले. या वेळी मुख्याध्यापक पुंडलिक पाटील,शिक्षक शहाजी अभिमन्यू घायतिडक, शुभांगी शशिकांत भंडारकर,जागृती जीवन तेलंगे, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी नागरिकांना मतदानाचा अधिकार बजावण्याबाबत उद्बोधन केले.

स्वीप मतदार जागृती अभियान अंतर्गत घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांकडून पालकांना पत्र देऊन जनजागृती करण्यात आली. तसेच निबंध स्पर्धाही घेण्यात आल्या.

विधानसभा निवडणुकीसाठी उरण मतदारसंघामध्ये मतदानाची टक्केवारी वाढवी, नागरिकांरी मोठ्या संख्येने आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे.



# मतदान करा व मसाले मजुरीवर सवलत मिळवा!

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त मतदान मतदार राजाने करावे यासाठी जयहिंद मसाला ॲण्ड फ्लोअर मिल यांनी मतदान करा व मसाले मजुरीवर ५० टक्के सवलत मिळवा, असा अभिनव उपक्रम २० नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राबविण्यात येणार असल्याची माहिती समीर माखेजा यांनी दिली.

जास्तीत जास्त पनवेलकरांनी मतदान करावे, आपला मतदानाचा हक्क बजावावा व राज्यात स्थिर सरकार यावे यासाठी जयहिंदा मसाला ॲण्ड फ्लोअर मिलच्या माध्यमातून



ग्राहकांना आगळी वेगळी योजना राबविण्यात येत असून त्यामध्ये मतदान करा व मसाला मजुरीवर ५० टक्के सवलत मिळावा (चालू दर ४० रुपये आहे.) यासाठी प्लॉट नं -६६, कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्पतरू सोसायटी रोड, पनवेल (९३२००४४०३३/९७०२२४४०३३) येथे संपर्क साधावा, असे आवाहन समीर माखेजा यांनी केले आहे.

# घराघरात तुळशी विवाहाची लगबग



**उरण : प्रतिनिधी**

तुळस ही आपल्या सर्वगुण संपन्न वृंदेप्रमाणे आहे. श्रीविष्णू यांना तुळस अतिप्रिय म्हणून तिला हरिप्रिया म्हणतात. पुढे वृंदा हिनेही द्वापार युगात रुक्मिणीच्या रूपाने अवतरून विष्णूचा अवतार जो श्रीकृष्ण त्यास कार्तिक शुध्द द्वादशीच्या दिवशी वरले. अशा प्रकारे, हिंदू लोक रुक्मिणी-कृष्ण विवाह तुळशी विवाह विधीच्या रूपाने त्या दिवशी दरवर्षी साजरा केला जातो. उरण तालुक्यातील घराघरांत या विवाहबद्दल उत्सुकता शिगेला पोहचलेली आहे.

**तुळशी विवाहामुळे सध्या नागरिकांचा नवीन तुळशीचे रोपटे घेण्याकडे अधिक कल आहे. यामुळे नर्सरीत इतर झाडे घेण्यापेक्षा तुळशीचे रोपटे घेण्यासाठी गिऱ्हाईक येत आहे. अनेक लोकं तुळशीचे नवीन रोपटं तुळशीच्या लग्नानिमित्त घेऊन स्वतःच्या अंगणातील कुंडीत लावतात.**
**-रामरतन तिवारी, नर्सरी वृक्ष विक्रेते, उरण**

१३ नोव्हेंबरपासून या विवाहाला प्रारंभ होत असून उरणमधील बाजारपेठही तुलसी विवाहाच्या साहित्याने नटली आहे. उरणमधील नागरिकांची खरेदीसाठी झुंबड उडत आहे. तुळशीचे लग्न हा पूजोत्सव आहे. त्यात तुळस ही वधू, बाळकृष्ण हा वर, तर ऊस हा मामा समजला जातो. सोहळ्यासाठी नागरिकांनी तुळशी वृंदावन सारवून,स्वच्छ करून सुशोभित करण्यास सुरवात केली आहे. त्याचप्रमाणे उरणच्या बाजारपेठेत ऊस, आवळे, चिंचा आत्तापासुनच विक्रीसाठी पाहायला मिळत आहेत.

तुळशीच्या शोड शोपचार पूजा करण्यासाठी, सौभाग्यलेणे, नवीन साज, ओटी हे साहित्यदेखील पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे तुळशी विवाहासाठी झाडांच्या नर्सरीमध्ये तुळशीच्या रोपे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत. इथे नागरिक राम तुळशीपेक्षा कृष्ण तुळशीला अधिक पसंत देत असल्याचे नर्सरी वाल्यांकडून सांगण्यात येत आहे. सांस्कृतिक दृष्ट्या उरण शहर नटलेले आहे येथे अनेक प्रथा परंपरा सण उत्सव आनंदात साजरे केले जात आहेत. तुळशी विवाहाची परंपरा उरण तालुक्यात मोठ्या उत्साहात पार पाडली जात असून, तुळशी विवाहांनंतरच उरण तालुक्यात विवाहाच्या बोलचाली केल्या जात असल्याचेही निदर्शनास येते.

उरण तालुक्यातील सांस्कृतिक संपन्नता पाहता उरण मधील बाजारपेठ तुळशी विवाहाला लागणाऱ्या साहित्याने नटली आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढत आहे.

# सीआयआय शिष्टमंडळाची जनेपला भेट

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जनेप प्राधिकरण) सहकार्य वाढविण्याच्या आणि उद्योग संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने वरिष्ठ उद्योग व्यावसायिकांसह भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) उच्चस्तरीय शिष्टमंडळाचे यजमानपद भूषवले. भारताच्या बंदर क्षेत्राच्या प्रगतीसाठी व्यापार पायाभूत सुविधा आणि सामायिक उद्दिष्टांवर मौल्यवान चर्चेसाठी या भेटीने एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ, यांनी सीआयआयच्या शिष्टमंडळाचे स्वागत केले आणि परस्पर हितसंबंधांच्या मुद्यावर चर्चा केली. या भेटीबद्दल भाष्य करताना ते म्हणाले, उद्योग क्षेत्रातील दिग्गजांशी संपर्क साधण्याची ही संधी निर्माण केल्याबद्दल आम्ही सीआयआयचे मनापासून आभार मानतो. या क्षेत्राच्या



सतत विकसित होत असलेल्या मागण्यांसह आपल्या प्रयत्नांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी, असे संवाद होणे आवश्यक आहे. जनेप प्राधिकरणात, आम्ही देशांतर्गत आणि जागतिक स्तरावर व्यापाराच्या मजबूत आणि अखंड प्रवाहाला आणि प्रभावी कामकाजाला समर्थन देणारी भागीदारी वाढवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

त्यांच्या भेटीदरम्यान, सीआयआयच्या शिष्टमंडळाने जनेप प्राधिकरण विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड)ला भेट देऊन तेथील कामकाज जाणून घेतले तसेच जनेप प्राधिकरणाच्या प्रमुख टर्मिनल्सपैकी एक असलेल्या एनएसएफटी (न्हावा शेवा फ्री ट्रेड) टर्मिनलची त्याची परिचालन क्षमता आणि टर्मिनलची व्यापार व्यवहार सुव्यवस्थित करण्यात असलेली भूमिका समजून घेण्यासाठी भेट दिली. त्यानंतर शिष्टमंडळासमोर जनेप प्राधिकरणाच्या चालू आणि भविष्यातील प्रकल्पांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला, ज्यात शाश्वत वाढ, डिजिटल प्रगती आणि बंदर कार्यक्षमता यासाठीचे प्रयत्न आदी विषय समाविष्ट होते.

सीआयआयच्या शिष्टमंडळासह एसईझेड-वेलस्पन वन, व्हॉलुमनस डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड, स्टेलर व्हॅल्यू चेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड, फिलिप कॅपिटल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, म्हैसूर अमोनिया अँड केमिकल्स लिमिटेड, केमट्रॉल इंडस्ट्रीज लिमिटेड यासारख्या आघाडीच्या संस्थांच्या प्रतिनिधींनी आणि प्रमुख संस्थांमधील इतर उल्लेखनीय सहभागींनी जनेप प्राधिकरणाला भेट दिली.

मजबूत औद्योगिक संबंध निर्माण करण्यासाठी आणि भारताच्या आर्थिक वाढीला आणि व्यापार उत्कृष्टतेला चालना देणारे जागतिक दर्जाचे बंदर बनण्याच्या दृष्टीकोनाला पुढे नेण्यासाठी जनेप प्राधिकरणाची वचनबद्धता (सीआयआयच्या शिष्टमंडळाच्या) या भेटीतून अधोरेखित होते.

### माथेरानमध्ये महायुतीची प्रचार रॅली

# महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांच्या विजयासाठी कार्यकर्ते एकवटले

**माथेरान : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस उरलेले असल्याने माथेरानमधील महायुतीचे कार्यकर्ते हे एकवटले असून महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना भरघोस मताधिक्य मिळवून देण्यासाठी पूर्ण माथेरान शहर पिंजून काढण्यात व्यस्त झालेले दिसत आहेत.





या वेळी भाजप शहरध्यक्ष प्रवीण सकपाळ, शिवसेना शहरसंघटक मनोज खेडकर, संपर्कप्रमुख निखिल शिंदे, भाजप उपशहराध्यक्ष किरण चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते विलास पाटील, शैलेंद्र दळवी, शिवसेना उपशहर प्रमुख प्रमोद नायक, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, चंद्रकांत जाधव, प्रदिप घावरे, राकेश चौधरी, ज्येष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, योगेश जाधव, राकेश कोकळे, शैलेश चाफेरकर, महिला आघाडीच्या वर्षा शिंदे, सुहासिनी शिंदे, प्रतिभा घावरे, अंकिता तोरणे, रुपाली शिंगाडे, श्रुतिका दाभेकर, प्रीती कळंबे, सुप्रिया कदम, प्रियांका कदम, अंकिता तोरणे, रुपाली शिंगाडे, श्रुतिका दाभेकर, प्रीती कळंबे, सुप्रिया कदम, प्रियांका कदम, प्रतिभा कदम, भारती कदम यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या प्रचारासाठी उपस्थित होत्या.

माथेरान शहरामध्ये जवळपास चार हजारांच्या आसपास मतदारसंख्या असून महायुतीचे कार्यक्षम उमेदवार महेंद्र थोरवे यांना अधिकाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी माथेरानमधील महायुतीचे सर्वच कार्यकर्ते एकवटले आहेत. मुख्य बाजारपेठेमधील श्रीराम मंदिरात दर्शन घेऊन प्रचारास सुरुवात करण्यात आली. शहरातील दूरवरच्या पॉईंट परिसरात राहणाऱ्या मतदारांच्या घरी जाऊन महायुतीच्या पूर्ण कार्याचा अहवाल देण्यात आला. महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी त्यांच्या कार्यकाळात माथेरानमध्ये केलेली विकासकामे याबाबत येथील ज्येष्ठ नागरिकांना समजावून सांगण्यात आले, तसेच महेंद्र थोरवे यांचे हात बळकट करण्यासाठी या वेळी ही आपले बहुमुल्य मत धनुष्यबाण याच ठिकाणी द्या अशी कार्यकर्त्यांकडून आवाहन करण्यात आले आहे.

महायुतीच्या या प्रचाररॅलीमध्ये माथेरानमधील नागरिकांना पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आणि येत्या निवडणुकीत विजयाचा संकल्प करण्यात आला.

# महाविकास आघाडी जातीयवाद निर्माण करतेय -प्रकाश देसाई

**नागोठणे : बातमीदार**



महायुतीने पेण-सुधागड विधानसभा मतदारसंघात आमदार रविशेठ पाटील यांच्या रूपाने भिष्माचार्य उमेदवार दिलेला असल्यामुळे आजच त्यांचा विजय झालेला असून फक्त गुलालाची उधळण करणेच बाकी आहे. महाविकास आघाडी लोकांची दिशाभूल करून जातीयवाद निर्माण करीत असल्याचा आरोप शिवसेना जिल्हासंपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनी केला.

महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांच्या प्रचारानिमित्त पेणमधील सभेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी महाराष्ट्रातील विकासाच्या प्रगतीचा आलेख उंचावलेला असल्यामुळे सर्व जनता त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे हे तीनही नेते महाराष्ट्रातील तमाम बहिणींचे लाडके भाऊ झाले आहेत. विरोधक कितीही अपप्रचार करीत असले तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद पडणार नाही. आमदार रविशेठ पाटील यांच्या विरोधातील दोन्ही उमेदवार आपल्या बॅनरवर शरदचंद्र पवार व उद्धव ठाकरे यांचे फोटो लावून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत, परंतु जनतेला कळून चुकले आहे, असाही आरोप त्यांनी केला.

## रायगड जिल्ह्यात गुलाबी थंडीची चाहूल

**अलिबाग :** गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हवेत धुके व गारवा सुरू झाल्याने थंडीची चाहूल लागत असल्याने वातावरणात गारवा जाणवत असून थंडीची सुरूवात झाली आहे. गेल्या काही दिवसांत थंडीचा जोर वाढू लागला आहे. ऑक्टोबर महिन्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने वातावरणात असह्य उकाडा जाणवत होता, मात्र गेल्या काही दिवसांत सकाळी थंड हवेचा अनुभव येऊ लागला आहे, तसेच धुके दाटत आहे. पुढील काही दिवसात थंडी वाढेल व गुलाबी थंडीचा अनुभव मिळेल, असे जाणकार सांगतात. थंडीचे हवामान कडधान्य शेतीला पूरक असून शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

# श्रीवर्धन बाजारपेठेतील गटाराचे काम संथ गतीने

## ■ वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक हैराण

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन बाजारपेठेतील दादर पुलाजवळ अंदाजे २० मीटर लांबीच्या गटाराचे काम सुरू करण्यात आले आहे, मात्र हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. ज्या ठिकाणी गटाराचे काम सुरू आहे तो रस्ता अत्यंत रहदारीचा असून सकाळ, दुपार, संध्याकाळ त्या ठिकाणी वाहनांच्या रांगाच रांगा लागलेल्या पहायला मिळतात.



गटार खोदलेले असल्यामुळे गटारातील काढलेला मलबा, दगड, त्याचप्रमाणे माती रस्त्यावर एका बाजूला रचून ठेवल्यामुळे रहदारीसाठी अत्यंत अरूंद रस्ता शिल्लक राहिलेला आहे. त्यातच बाजारपेठेत अवैधरित्या पार्किंग करणाऱ्या दुचाकीस्वारांमुळे परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

संबंधित ठेकेदाराने कामावर केवळ दोनच मजुरांची नियक्ती केली आहे. जर त्या ठिकाणी जास्त मजूर लावून हे काम लवकरात लवकर आटोपले असते तर नागरिकांनादेखील सोयीचे झाले असते. नगर परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर ठेकेदाराला सूचना देऊन कामावरती जास्त मजूर लावून काम दोन दिवसांमध्ये समाप्त करून घ्यावे, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## मुरूडमध्ये उद्या रक्तदान शिबिर



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-जंजिरा मेडिकल असोसिएशन सलग्न मुरुड श्रीराम बँक यांच्या वतीने शुक्रवारी (दि.१५) सकाळी ८ वा.ते सायं. ४ वा.पर्यंत कल्याणी हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कोणताही रुग्ण रक्ताविना त्याचे हाल होऊ नये, त्याकरिता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील बंधूभगिनींनी या शिबिरात सहभागी होऊन सहाकार्य करावे, असे आवाहन मुरूड जंजिरा मेडिकल असोसिएशनतर्फे डॉ. राज कल्याणी यांनी केले आहे.

# चौल शितळादेवी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल शितळादेवी ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांचे कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत नुकताच शिवसेनेत प्रवेश केला.



चौल शितळादेवी मंदिराचे प्रांगणातील रंगमंचावर आमदार महेंद्र दळवी यांचे उपस्थितीत पक्षप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर, राष्ट्रवादी जिल्हा सचिव आशिष भट, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, सहकार भारती संघटन रायगड जिल्हा प्रमुख दिलीप पटेल, राष्ट्रवादीचे पदाधिकारी प्रवीण राऊत, चंपावती पंतसंस्थेचे अध्यक्ष विश्वास जोशी, भाजप कार्यकर्ते संकेत जोशी, शिवसेनेचे प्रशांत शेणवईकर, रेवदंडा सदस्य दुशांत झावरे, हर्षल घरत, प्रसाद गोंधळी, कल्पेश नाईक, चौल माजी सरपंच प्रतीक्षा राऊत, रेवदंडा महिला शाखाप्रमुख शलाका राऊत, आग्राव महिला शाखाप्रमुख ज्योती शैलेश मुंबईकर, तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी विकास पाटील, नारायण घरत, चंद्रकांत वर्तत, प्रभाकर वर्तक, प्रशांत नाईक, बाळाराम वर्तक, चंद्रकांत कुरूळकर, मिलिंद नाईक, संतोष नाईक, अमित नाईक, मंदार वर्तक, मयुर वर्तक, दिपक वर्तक, वैभव नाईक, सुधाकर गुरव यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे शिवसेना पक्षात स्वागत करून चौलच्या विकासासाठी यापुढे निश्चित प्राधान्य देईन व चौल विकासासाठी दत्तक घेणार असल्याचे सांगितले. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष हेमंत दांडेकर यांनी, महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांचा विजय निश्चित असल्याचे सांगून भविष्यात चौल ग्रामपंचायतीत महायुतीची सत्ता येईल, असा दावा केला.

## माणगावात नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगावातील उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१३) नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ८५ रुग्णांची तपासणी करून २७ रुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

शिबिरासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे आभार व्यक्त केले. सदर शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ.सिली, गुरुनाथ घुडे, नेहा कदम, अवंतिका रिकामे, ओंकार पाटील, ज्ञानोबा कांबळे यांनी सहकार्य केले.

# माणगावात मंत्री आदिती तटकरे यांच्या विजयासाठी जोरदार प्रचार

**माणगाव : प्रतिनिधी**



श्रीवर्धन मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार मंत्री आदिती तटकरे यांच्या विजयासाठी माणगावात लाडक्या बहिणींनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. नगरपंचायत हद्दीतून आदितीताईंना मोठे मताधिक्य देणार, असा विश्वास नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांनी व्यक्त केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात महायुतीतर्फे राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आदिती तटकरे यांनी या मतदारसंघातून सन २०१९मध्ये दणदणीत मतांनी विजय संपादन केला होता. पुन्हा २०२४च्या निवडणुकीत आदितीताईंना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी माणगावमधील महायुतीच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह लाडक्या बहिणी सज्ज झाल्या आहेत. नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी सांगितले की, शहरातील विकासकामे महायुती सरकारच्या माध्यमातून झाली आहेत. त्यातच राज्याच्या मंत्रिमंडळात अडीच वर्षे आदितीताईंना महिला व बालविकास खात्याची मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यावर त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर अधिक भर दिला. या विभागाच्या माध्यमातून त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. त्या माध्यमातून लाभार्थी महिलांना आज दरमहा १५०० रुपये सन्मान निधी मिळत आहे. याचबरोबर शहरातील विकासकामांनाही महायुती सरकारच्या माध्यमातून गती देण्यात आली आहे. नगरपंचायतीची नवीन इमारत तसेच शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी महायुती सरकारच्या माध्यमातून मंजूरी मिळाली आहे. सार्वजनिक विकासकामांबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभही महायुतीच्या सरकारने जनतेने दिला आहे. त्यामुळे हे गतिमान सरकार पाहता दुसऱ्यांदा आदितीताई श्रीवर्धन मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बहुजन युथ पँथरचा आमदार महेंद्र थोरवे यांना पाठिंबा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवित असलेले महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांना बहुजन युथ पँथरने जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

कर्जत विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढवीत असलेले शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांना बहुजन युथ पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांनी जाहीर पाठिंबा दर्शवून तसे पत्र त्यांनी जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी दिले. या वेळी जाधव म्हणाले, आमदार थोरवे यांनी लोकाभिमुख कामे केली असून आगामी काळातही ते अधिक कामे करतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यासाठी आपण जागा उपलब्ध करून देऊन त्याचे भूमिपूजन करून आपण महाराष्ट्रातील जनतेला दाखवून दिले की, आपण सामाजिक समता जपत आहात. तुम्हाला निवडून देण्यासाठी आम्ही पाठीशी आहोत, असा शब्द जाधव यांनी दिला.



## माथेरानचा दिवाळी हंगाम संपल्यानंतर पर्यटक परतीच्या प्रवासाला


**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळ हे दिवाळी पर्यटन हंगामात पर्यटकांनी फुलून गेले होते. मागील १० ते १२ दिवस याठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झालेली दिसत होती. आता दिवाळी सुट्ट्या या संपल्या असून आपल्या कुटुंबासोबत धमाल, मौजमस्ती केल्यानंतर पर्यटकांचा ओघ हळूहळू परतीच्या वाटेकडे लागल्याचे चित्र दिसत आहे.



निसर्गसौंदर्याने नटलेले तसेच निसर्गाचा अनमोल ठेवा असलेले पर्यावरणपूरक महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध थंडहवेचे पर्यटनस्थळअसलेल्या माथेरान पर्यटनस्थळी दिवाळी हंगामात पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळाली. माथेरानमधील पावसाळी पर्यटन हंगामाप्रमाणे हा दिवाळी हंगाम जोरदार झाला. हजारोंच्या संख्येने येथे पर्यटक दाखल झाले होते. प्रेक्षणीय स्थळांवर पर्यटकांची गर्दी दिसत होती. शार्लोट तलाव, एको पॉईंट, लुईझा पॉईंट, सनसेट म्हणून ओळखला जाणारा पार्क क्यू पाईन पॉइंट, मंकी पॉईंट, हार्ट पॉईंट या स्थळांवर पर्यटक धमाल, मस्ती करताना दिसत होते. येथील ऑलिम्पिया रेसकोर्सवर घोडेस्वारी करणारे पर्यटक दिसत होते, मात्र आता दिवाळी सुट्ट्या संपल्या पर्यटक परतीच्या मार्गावर लागले आहेत.

परतीच्या प्रवासाला जाताना पर्यावरण पूरक ई-रिक्षा आणि मिनीट्रेनला पसंती दिली. सकाळपासून रात्रीपर्यंत ई-रिक्षा धावत होत्या. पर्यटकांची रांग वाढत असताना देखील ई-रिक्षाचालकांनी पर्यटकांना सेवा देऊन त्यांच्या परतीचा प्रवास सुखकर केला. मिनीट्रेनच्या तिकिटासाठी दोन-दोन तास उभे राहून तिकीट मिळवण्यात काही पर्यटकांना यश आले.



**श्रीवर्धन : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी बोर्लीपंचतन व दिवेआगार येथे रूटमार्च केले.**

# अर्जुन तेंडुलकरची रणजी करंडकमध्ये भेदक गोलंदाजी

## प्रथमच पटकावल्या ५ विकेट्स

**गोवा : वृत्तसंस्था**

मास्टर ब्लास्टर खेळाडू सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये मोठी कामगिरी केली आहे. गोव्याकडून खेळणाऱ्या अर्जुनने पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी स्पर्धेत पाच विकेट्स घेतल्या आहेत. रणजी ट्रॉफीच्या अरुणाचल प्रदेशविरुद्ध सामन्यात अर्जुनने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ही कमाल कामगिरी केली आहे. पोर्वोरिम येथील गोवा क्रिकेट असोसिएशन अकादमी मैदानावर हा सामना खेळवला जात आहे.

२५ वर्षीय डावखुरा वेगवान गोलंदाज अर्जुन तेंडुलकरने अरुणाचल प्रदेशच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. त्याने ९ षटकांत २५ धावा देत ५ विकेट घेतले. यादरम्यान अर्जुनने ३ मेडन षटके टाकली. अर्जुनने आपल्या १७व्या प्रथम श्रेणी सामन्यात ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. या सामन्यात अरुणाचल प्रदेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय



घेतला, मात्र सामन्याच्या दुसऱ्याच षटकात अर्जुनने अरुणाचल प्रदेशचा सलामीवीर नबाम हाचांगला क्लीन बोल्ड केले.

अर्जुन तेंडुलकरने अरूणाचल संघाच्या ५ फलंदाजांना बाद करीत संघाला जबरदस्त सुरुवात करून दिली. पहिल्या विकेटनंतर नीलम ओबी (२२) आणि चिन्मय पाटील (३) यांनी थोडी झुंज दिली, मात्र १२व्या षटकात लागोपाठ दोन विकेट घेतल्यामुळे पाहुण्या संघाची अवस्था आणखीच बिकट झाली. अर्जुनने पाच विकेट पूर्ण करेपर्यंत अरुणाचलची धावसंख्या १७.१ षटकांत ३६/५ अशी होती.

अरुणाचलचा कर्णधार नबाम अबो याने २५ चेंडूत पाच चौकारांसह नाबाद २५ धावा केल्या. परिणामी संघ ३१व्या षटकात केवळ ८४ धावांवर सर्वबाद झाला. अर्जुनव्यतिरिक्त मोहित रेडकरने १५ धावा देत ३ विकेट्स आणि कीथ मार्क पिंटोने ३१ धावा देत २ विकेट्स घेत गोव्यासाठी चांगली गोलंदाजी केली.

अर्जुनने या सामन्यापूर्वी १६ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ३२ विकेट घेतले होते, ज्यामध्ये त्याची मागील सर्वोत्तम कामगिरी ४९ धावांवर ४ विकेट होती. गोलंदाजीशिवाय अर्जुन हा खालच्या फळीतील चांगला फलंदाज आहे. त्याने २३.१३च्या सरासरीने ५३२ धावा केल्या आहेत, ज्यात एक शतकं आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. ही कामगिरी अर्जुनच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरेल.

# पनवेलमधील मुली भुसावळमध्ये चमकल्या

## ऑल इंडिया राणी लक्ष्मीबाई महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेतील कामगिरी

**पनवेल : वार्ताहर**

नुकत्याच पार पडलेल्या भुसावळ येथील ऑल इंडिया राणी लक्ष्मीबाई महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मुलींनी चमकदार कामगिरी केली आहे.

भुसावळ येथे पार पडलेल्या ऑल इंडिया राणि लक्ष्मीबाई महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या मुलींनी एकूण चार महिला बॉक्सर्सने सहभाग घेतला. त्यात दोन सुवर्ण व दोन रौप्यपदकांची कमाई केली. यामध्ये पनवेलची उन्नती परदेशी (युथ, ५४-५७)मध्ये सुवर्णपदक, खारघरची सई कारंडे (कॉडेट, ४६-४८)मध्ये सुवर्णपदक, नवीन पनवेलची किरण चव्हाण (एलिट, ५२-५४) रौप्यपदक व पनवेलची अस्मी ठाकरे (कॉडेट, ४८ - ५०)मध्ये रौप्यपदक पटकाविले.



या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय विजेते माजी बॉक्सर व सध्याचे प्रशिक्षक नरेंद्र मोरे व माजी राष्ट्रीय खेळाडू, मुंबईचे प्रशिक्षक कृष्ण सोनी यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन विश्वविजेती व ऑलिम्पिक पदकप्राप्त मेरी कॉम यांच्या हस्ते झाले.

# विराट-यशस्वी ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर झळकले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात होण्यासाठी १० दिवस बाकी आहेत. या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये सुरुवात होणार आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांनी भारतीय चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

पर्थ कसोटीपूर्वी ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रांमधील पहिल्या पानावर भारतीय खेळाडूंचे फोटो झळकल्याने सर्व चकित झाले आहेत.

ऑस्ट्रेलियातील वृत्तपत्रांनी भारतीय चाहत्यांना आकर्षित करण्यासाठी हिंदी आणि पंजाबी







भाषेत आपली मते लिहिली आहेत. याशिवाय हिंदीतही जाहिरात देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियन ब्रॉडकास्टर आणि क्रिकेट बोर्डाला भाराताविरूद्धच्या मालिकेतून जास्तीत जास्त उत्पन्न मिळण्याची आशा आहे. द डेली टेलिग्राफने विराट कोहलीचा मोठा फोटो छापत या मालिकेबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी हेडिंग हिंदीतही लिहिले आहे. त्यांनी लिहिले, युगांची लढाई. याशिवाय त्यांनी यशस्वी जैस्वालचाही फोटो छापला असून पंजाबीमध्ये द न्यू किंग असे लिहिले आहे.

या दौऱ्यात टीम इंडिया ऑस्ट्रेलियात सलग तिसरी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी जिंकण्याच्या मानसिकतेने मैदानात उतरेल. यापूर्वी २०१८-१९ आणि २०२०-२१मध्ये ऐतिहासिक कामगिरी केली होती. २०१४पासून भारताने ऑस्ट्रेलियाविरूद्ध एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. या कालावधीत संघाने ४ मालिका जिंकल्या आहेत. आणखी एक मालिका जिंकून विजयी परंपरा कायम राखण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.

# हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय महिलांचा सलग दुसरा विजय

## दक्षिण कोरियावर ३-२ ने मात

**बिहार : वृत्तसंस्था**

भारतीय महिला हॉकी संघाने महिला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेतील सामन्यात स्ट्रायकर दीपिकाने सामना संपण्यास तीन मिनिटे असताना पेनल्टी स्ट्रोकवर नोंदवलेल्या गोलाच्या आधारे दक्षिण कोरियावर ३-२ असा विजय मिळविला. अन्य सामन्यात चीनने मलेशियावर ५-० अशी एकतर्फी मात केली तर थायलंड व जपान यांचा सामना १-१ असा बरोबरीत राहिला.

पूर्वार्धात भारताने २-० अशी आघाडी मिळविली होती. संगीता कुमारीने तिसऱ्या मिनिटाला तर दीपिकाने २०व्या मिनिटाला है गोल नोंदवले. कोरियाने तिसऱ्या सत्रात जोरदार मुसंडी मारत दोन गोल नोंदवून भारताशी बरोबरी साधली. युन लीने ३४व्या तर कर्णधार युनबी चेऑनने ३८व्या मिनिटाला हे गोल नोंदवले. निर्णायक गोल नोंदवण्यासाठी दोन्ही संघांनी जोरदार प्रयत्न सुरू केले



आणि त्यात भारताला यश मिळाले. ५७व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी स्ट्रोकवर दीपिकाने वैयक्तिक दुसरा व संघाचा तिसरा गोल नोंदवत भारताचा विजय निश्चित केला. भारताची पुढील लढत थायलंडविरूद्ध गुरुवारी होणार आहे. भारतीय महिलांनी प्रारंभापासूनच आक्रमक खेळ केला. त्यांनी इतके वर्चस्व राखले होते की, पहिल्या दोन सत्रात दक्षिण कोरियाला भारतीय गोलच्या दिशेने एकही फटका मारण्याची संधी मिळाली नाही. कोरियन बचावफळीवर भारताने वारंवार हल्ले करीत त्यांना दडपणाखाली ठेवत काही संधी निर्माण केल्या. त्यापैकी दोनवर मैदानी गोल नोंदवण्यात भारताला यश आले. तिसऱ्याच मिनिटाला संगीताने भारताला आघाडी मिळवून दिली.

नेहा गोयलने चाल रचत नवनीत कौरकडे चेंडू पुरविला. तिने सर्कलमधील संगीताकडे चेंडू सोपवला. तिने मार्करला हुलकावणी देत रिव्हर्स फटक्यावर चेंडूला अचूक गोलपोस्टची दिशा दिली. उत्तरार्धात कोरियाने बरोबरी साधल्यानंतर अखेरच्या टप्प्यात दीपिकानेच पेनल्टी स्ट्रोकवर भारताचा निर्णायक विजयी गोल नोंदवला.



# वर्ल्ड युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपमध्ये उमा महेशला सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रतिष्ठेच्या एफआयएसयू वर्ल्ड युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या उमा महेशने नेमबाजीत सुवर्णपदक पटकावले.

पुरुषांच्या १० मी. एअर रायफल सांघिक नेमबाजीत त्याने हे यश मिळविले. ऑलिम्पिक पदकविजेता गगन नारंग यांची गन फॉर ग्लोरी अकादमीत प्रशिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय उमाने आणखी एका पदकाची भर घातली. याआधी त्याने आयएसएसएफ वर्ल्ड कप आणि आशियाई चॅम्पियनशिपमध्येही सुवर्णपदके पटकावली आहेत. आंध्रप्रदेशमधील विजयवाडा येथील रहिवासी आहे.


# ऑक्शनआधी गुजरात टायटन्समध्ये दिग्गज खेळाडूचा संघात प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ स्पर्धेपूर्वी गुजरात टायटन्सच्या ताफ्यात मोठा बदल पाहायला मिळाला आहे. भारताचा माजी फलंदाज पार्थिव पटेलची गुजरात टायटन्सच्या सहाय्यक आणि फलंदाजी प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.

पार्थिव पटेलला आयपीएल स्पर्धेत खेळण्याचा दांडगा अनुभव आहे. यापूर्वी त्याने डेक्कन चॅलेंजर्स, कोची टस्कर्स केरला, चेन्नई सुपर किंग्ज, सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. आता हा अनुभवी खेळाडू गुजरातकडून खेळताना दिसून येणार आहे.

गुजरात टायटन्सने याबाबत घोषणा करीत म्हटले की, १७ वर्षांचा अनुभव



घेऊन भारतीय संघाचे माजी यष्टीरक्षक फलंदाज पार्थिव पटेल आमच्या संघात आपला अनुभव घेऊन येणार आहेत. आयपीएल फ्रेंचायझींसोबत काम करण्याची ही पहिलीच वेळ नसणार आहे. यापूर्वी त्याने मुंबई इंडियन्स संघासाठी टॅलेंट स्काऊटचे काम केले आहे. यांसह त्याने मुंबई एमिरेट्स संघासाठी फलंदाजी प्रशिक्षकाची भूमिकादेखील बजावली आहे. पहिल्या हंगामापासून आयपीएल खेळणारा पार्थिव २०१८मध्ये आपली शेवटची आयपीएल स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला होता.

पार्थिव पटेल गुजरातचाच खेळाडू आहे. त्यामुळे या संघातील खेळाडूंना त्याच्या अनुभवाचा चांगलाच फायदा होऊ शकतो. त्याच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले, तर त्याला भारतीय संघासाठी २५ कसोटी, ३८ वनडे आणि २ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना त्याने ९३४ धावा केल्या. आयपीएल २०२२पासून हार्दिक पंड्या या संघाचा कर्णधार होता. पहिल्याच हंगामात त्याने या संघाला चॅम्पियन बनवले. त्यानंतर दुसऱ्या हंगामात या संघाने फायनल गाठली होती, मात्र तिसऱ्या हंगामापूर्वी हार्दिकने या संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला.

या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी शुभमन गिलकडे सोपवण्यात आली. आगामी हंगामापूर्वी गुजरातने शुभमन गिल, राशिद खान, साई सुदर्शन, राहुल तेवतिया आणि शाहरुख खानला रिटेन केले आहे.

# एटीपी फायनल्स टेनिस स्पर्धेत जेनिक सिनेरला करंडक

**ट्यूरीन : वृत्तसंस्था**

इटलीचा टेनिसपटू जेनिक सिनेरने २०२४च्या टेनिस हंगामाअखेर एटीपी मानांकनात आपले अग्रस्थान कायम राखत एटीपी फायनल्स टेनिस स्पर्धेत सिनेरचा करंडक पटकावला.




सिनेरने २०२४च्या टेनिस हंगामात ऑस्ट्रेलियन आणि अमेरिकन ग्रॅन्डस्लॅम स्पर्धा जिंकल्या आहेत. एक महिन्यापूर्वी सिनेरने एटीपी मानांकनातील आपले अग्रस्थान अधिक मजबूत केले होते. एटीपीच्या मानांकनात वर्षअखेरीस अग्रस्थान मिळविणारा इटलीचा सिनेर हा २९ वा टेनिसपटू आहे. येथे सुरू असलेल्या एटीपी फायनल्स टेनिस स्पर्धेत सिनेरचा सामना अमेरिकेच्या टेलर फ्रिजबरोबर होत आहे. चालू वर्षाच्या टेनिस हंगामामध्ये सिनेरची दोनवेळा उत्तेजक चाचणी घेण्यात आली होती आणि त्यामध्ये तो दोषी आढळला होता. त्यानंतर त्याने गेल्या सप्टेंबरमध्ये विश्वउत्तेजकविरोधी एजन्सीने त्याला या प्रकरणातून निर्दोष ठरविले आहे. दरम्यान या प्रकरणाची सुनावणी पुढील वर्षीच्या प्रारंभी होणार आहे.

# ऑप्टस स्टेडियमची खेळपट्टी वेगवान असल्याचे संकेत



**ऑस्ट्रेलिया : वृत्तसंस्था**

भारतीय संघ प्रतिष्ठेची बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळायला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आला आहे. २२ नोव्हेंबर ते ७ जानेवारी असा तब्बल प्रदीर्घ काळ हा दौरा असणार आहे. भारतीय संघ कोणताही सराव सामना न खेळता २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या पर्थ कसोटीत उतरणार आहे. ऑस्ट्रेलियात भारताला अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. तिथल्या खेळपट्टीवर टीम इंडियाला वेगवान आणि उसळीपूर्ण पिचवर सामने खेळावे लागणार आहेत. दोन्ही संघांमधील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटीचे आयोजन करणारी ऑप्टस स्टेडियमची खेळपट्टी पर्थच्या खेळपट्टीप्रमाणे चांगली उसळी घेणारी आणि वेगवान असेल, असे संकेत देण्यात आले आहेत.

१५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान भारतीय संघ स्वत:चेच २ संघ बनवून एक सराव सामना खेळणार होता, पण तो सामना रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे भारतीय संघ वाका स्टेडियमवर तयारी करणार आहे, जिथे ऑस्ट्रेलियन संघाचे खेळाडूही सराव करताना दिसणार आहेत.

वेस्टर्न ऑस्ट्रेलिया क्रिकेटचे मुख्य क्युरेटर आयझॅक मॅकडोनाल्ड यांनी सांगितले की, पर्थची खेळपट्टी खूप चांगल्या गतीने आणि बाऊन्सआसाठी तयार करण्यात आली आहे. मॅकडोनाल्ड म्हणाले की, खेळपट्टीवर थोडेफार गवत ठेवण्याचा विचार आहे. गेल्या वर्षीची परिस्थिती लक्षात घेता यंदा खेळपट्टीवर १० मिमी गवत असले तरी खेळ वेगवान होईल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com